रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक १२२
www.ramprahar.com

◆ बुधवार, १९ नोव्हेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## राष्ट्रीय जल पुरस्कारांमध्ये महाराष्ट्राचा डंका; राष्ट्रपतींच्या हस्ते गौरव



**नवी दिल्ली :** येथे मंगळवारी (दि. १८) झालेल्या सोहळ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते राष्ट्रीय जल पुरस्कार प्रदान करण्यात आले. यात महाराष्ट्राला सर्वोत्कृष्ट राज्य विभागात प्रथम पुरस्काराने गौरवण्यात आले. जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी हा पुरस्कार स्वीकारला. या विभागात गुजरातला द्वितीय, तर हरियाणाला तृतीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याशिवाय उत्कृष्ट स्थानिक स्वराज्य विभागात नवी मुंबई महानगरपालिकेने प्रथम पुरस्कार पटकावला. सर्वोत्कृष्ट जलवापरकर्ता संस्था विभागात नाशिक जिल्ह्यातील कनिफनाथ जलवापर सहकारी संस्थेला द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यक्रमास केंद्रीय जलशक्ती मंत्री सी.आर. पाटील, राजमंत्री व्ही सोमन्ना, राजभूषण चौधरी उपस्थित होते. या पुरस्कार सोहळ्यात १० विभागांमध्ये ४६ पुरस्कार प्रदान करण्यात आले.

अंतरंग

रत्नागिरीमध्ये अपघातात दोघांचा मृत्यू, दोघे गंभीर/२

नवी मुंबई विमानतळावरून रोज २३ विमाने झेपावणार/६

डब्ल्यूपीएलचा मेगा लिलाव २७ नोव्हेंबरला दिल्लीत/८

# आयकॉनिक शहर विकास धोरण जाहीर

### राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत सहा निर्णय

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य मंत्रिमंडळाची बैठक मंगळवारी (दि. १८) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीत महत्त्वाचे सहा निर्णय घेण्यात आले आहेत. यामध्ये राज्यात संकल्पना आधारित एकात्मिक वसाहती किंवा व्यावसायिक क्षेत्राची निर्मिती करण्याच्या दृष्टीने आयकॉनिक शहर विकासाचे धोरण राज्य सरकारने जाहीर केले आहे.



सिडकोसह विविध प्राधिकरणांच्या जमिनी आणि भूखंडाचा सुयोग्य वापर निश्चित करण्याला आयकॉनिक शहर विकासाचे धोरणात प्राधान्य राहील. सिडकोसह अन्य प्राधिकरणांना संबंधित संकल्पनांवर आधारित एकात्मिक वसाहती निर्माण करण्याकरिता अधिकार मिळतील. निवासी एकात्मिक वसाहत किंवा आंतरराष्ट्रीय व्यावसायिक क्षेत्रांची उभारणी होईल. सिडको व विविध प्राधिकरणांकडील लँड बँकेचा सुयोग्य वापर व्हावा यासाठी हे धोरण उपयुक्त ठरेल.

या बैठकीत बृहन्मुंबई उपनगरातील २० एकर किंवा त्यापेक्षा अधिक क्षेत्रफळावरील म्हाडाच्या गृहनिर्माण प्रकल्पांचा पुनर्विकास करण्याबाबतचे धोरणही निश्चित करण्यात आले. यातून मुंबई शहर व उपनगर क्षेत्रामध्ये नागरिकांसाठी मोठ्या प्रमाणात परवडणारी घरे उपलब्ध होणार आहेत.

भूसंपादन, पुनर्वसन, पुनर्स्थापनेची प्रकरणांच्या निपटाऱ्यासाठी नवीन पदांची निर्मिती होणार आहे. यामुळे भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३मधील कलम ६४ अन्वये दाखल असलेल्या प्रलंबित प्रकरणांचा जलदगतीने निपटारा होईल.

रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाकरिता ३३९ पदांची निर्मिती, शिक्षकांची २३२ आणि शिक्षकेतर १०७ पदांना या वेळी मान्यता देण्यात आली.

महाराष्ट्र भिक्षा प्रतिबंध कायद्यातील मानहानीकारक शब्द वगळण्यास कॅबिनेटने मान्यता दिली. याशिवाय महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम १९५०मध्ये सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली.

# नक्षलवादी चळवळीला हादरा!

### कमांडर माडवी हिडमासह सहा नक्षलींचा खात्मा

**गडचिरोली : प्रतिनिधी**

शेकडो सुरक्षा जवान आणि नागरिकांच्या मृत्यूला जबाबदार असलेला पीपल्स लिबरेशन गुरिला आर्मीचा प्रमुख आणि जहाल नक्षलवादी नेता माडवी हिडमा (वय ४४) याला ठार करण्यात सुरक्षा दलाला यश आले आहे.

आंध्र प्रदेश, छत्तीसगड आणि तेलंगणा या तीन राज्यांच्या सीमेवरील अल्लुरी सीतारामराजू जिल्ह्यात सुरक्षा दलांनी ही मोठी कारवाई केली. या कारवाईत हिडमाची पत्नी राजे उर्फ राजक्का हिच्यासह सहा नक्षल मारले गेल्याची माहिती सूत्रांनी दिली.



सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार हा त्रि-सीमा परिसर नक्षलवाद्यांचा बालेकिल्ला मानला जातो. या घनदाट जंगलात नक्षलवाद्यांचे अनेक गुप्त तळ असल्याची पक्की माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा दलांनी अत्यंत सुनियोजित पद्धतीने ही मोहीम आखली. मंगळवारी (दि. १८) पहाटेच्या सुमारास जवानांनी नक्षलवाद्यांच्या तळाला वेढा घातला असता दोन्ही बाजूंनी जोरदार गोळीबार सुरू झाला. या धुमश्चक्रीत माडवी हिडमा आणि त्याच्या साथीदारांचा खात्मा करण्यात जवानांना यश आले.

घटनास्थळावरून किमान सहा नक्षल्यांचे मृतदेह ताब्यात घेण्यात आले असून मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. संपूर्ण परिसरात अद्यापही शोधमोहीम सुरू आहे. हिडमा मारल्या गेल्याने शेवटची घटका मोजत असलेल्या नक्षल चळवळीला हादरा बसला आहे. त्याच्यावर विविध राज्यांत मिळून पाच कोटींहून अधिक बक्षीस होते.



**उरण :** येथील नगर परिषद निवडणुकीसाठी भाजप महायुतीच्या उमेदवारांनी अर्ज दाखल केल्यानंतर प्रचाराला जोरदार सुरुवात झाली आहे. नगराध्यक्षपदाच्या उमेदवार शोभा कोळी-शाह, नगरसेवकपदाचे उमेदवार रवी भोईर व शाहिस्ता कादरी तसेच निता महेश बालदी, पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी महायुतीच्या सर्व उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन मतदारांना केले. (वृत्त पान ६ वर..)

# बिबट्याच्या हल्ल्यांना राज्य आपत्ती म्हणून घोषित करण्याचे आदेश

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात बिबट्यांकडून वाढत चाललेल्या मानवी हल्ल्यांची समस्या राज्य आपत्ती म्हणून घोषित करण्याचा प्रस्ताव पुढील मंत्रिमंडळ बैठकीत मांडावा, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले तसेच आवश्यक ठिकाणी तातडीने पिंजरे बसवावेत. यासोबतच पुणे जिल्ह्यात बिबट्यांच्या उपचार व पुनर्वसनासाठी दोन रेस्क्यू सेंटर पुढील दोन ते तीन महिन्यांत सुरू करण्याचे आणि गोरेवाडासह इतर ठिकाणी सध्या असलेल्या रेस्क्यू सेंटरची क्षमता वाढविण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी संबंधित विभागांना दिले.




राज्यातील बिबट्यांच्या प्रश्नांसंदर्भात मंगळवारी (दि. १८) मंत्रालयात मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार, वनमंत्री गणेश नाईक, जलसंपदामंत्री गिरीश महाजन, माजी मंत्री व आमदार दिलीप वळसे-पाटील, आमदार शरद सोनवणे, मुख्य सचिव राजेश कुमार, वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, मदत व पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिव विनिता वैद सिंगल, राज्याचे प्रधान मुख्य वन संरक्षक (वनबल प्रमुख) एम श्रीनिवास राव, प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्य जीव) श्रीनिवास रेड्डी, पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी आदी उपस्थित होते.

राज्यात बिबट्यांचे हल्ले वाढले आहेत. त्यांना आळा घालण्यासाठी कालबद्ध पद्धतीने तातडीचे आणि दीर्घकालीन अशा दोन प्रकारे उपाययोजना करण्यात याव्यात. तातडीच्या उपायांमध्ये गावे व शहरांजवळील बिबट्यांना शोधून पकडण्यात यावेत. यासाठी ड्रोनची मदत घ्यावी. पिंजरे, वाहने, मनुष्यबळ आदी बिबटे पकडण्यासाठी आवश्यक साहित्यासाठी जिल्हा नियोजन समितीतून निधी उपलब्ध करून द्यावेत, तर दीर्घकालीन उपाययोजनेत बिबट्यांची नसबंदी करण्यात यावी, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

बिबट्यांचा समावेश शेड्यूल-१मध्ये आहे. त्यामुळे नरभक्षक बिबट्यांना पकडणे, त्यांना मारणे यावर मर्यादा येतात. या बिबट्यांना शेड्यूल-१मधून शेड्यूल २-मध्ये समाविष्ट करण्यासंदर्भात केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठवावा. बिबट्यांच्या नसबंदीची परवानगी केंद्र शासनाकडून मिळाली आहे. त्यामुळे नरभक्षक बिबट्यांना शोधून नसबंदी करण्यात यावे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी या वेळी सांगितले.

## निवडक

### दहशतवादी मोहम्मद उमरचा स्फोटापूर्वीचा व्हिडीओ समोर



**नवी दिल्ली :** राजधानी दिल्लीत बॉम्बस्फोट घडवणारा दहशतवादी डॉ. मोहम्मद उमर नबीचा एक नवा व्हिडीओ समोर आला आहे. हा व्हिडीओ ब्लास्ट करण्यापूर्वी काही तास आधीचा असल्याचे सांगितले जात आहे. या व्हिडीओत त्याने आत्मघाती बॉम्बस्फोटचे समर्थन केल्याचे पहायला मिळतेय. तपासासाठी हा व्हिडीओ महत्त्वाचा पुरावा ठरू शकतो.

### धुळ्यात भाजपची विजयी सलामी; नगराध्यक्षपदी बिनविरोध निवड

**धुळे :** दोंडाईचा वरवाडे नगर परिषदेच्या निवडणुकीत भाजपच्या उमेदवार नयनकुवर रावल यांची नगराध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली आहे. त्या राज्याचे मंत्री जयकुमार रावल यांच्या मातोश्री असून भाजपकडून नगराध्यक्षपदाच्या अधिकृत उमेदवार होत्या. यासोबतच भाजपचे आणखी सात नगरसेवकही बिनविरोध निवडून आल्याने या निवडणुकीत भाजपचे वर्चस्व कायम राहिले आहेत.



# कोकणात थंडीचा कडाका वाढला

### ग्रामीण भागात शेकोट्या पेटू लागल्या

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्यात थंडीचा कडाका वाढताना दिसत आहे. किमान तापमानात लक्षणीय घट जाणवू लागली असून कोकणातही वातावरण गारेगार बनले आहे.

उत्तर भारतात सध्या बर्फवृष्टीला सुरुवात झाली आहे. त्यामुळे बर्फाळ वारे दक्षिणेकडे वाहत आहेत. महाराष्ट्रातही याचा परिणाम होऊन थंडीमध्ये वाढ झाली आहे.

राज्यात बहुतांश ठिकाणी तापमानाचा पारा १५ अंशांच्या खाली गेला आहे. कोकणातही दिवसा गार हवा आणि रात्री बोचऱ्या थंडीचा अनुभव येत आहे. थंडीमुळे रात्री शेकोट्या पेटू लागल्या असून उबदार कपड्यांची मागणीही वाढली आहे.

कोकणात गुलाबी थंडीत सध्या धुकेही पहावयास मिळत आहे. घाट आणि खाडी परिसरात पहाटे दाट धुक्याची चादर पसरते. त्यामुळे वाहनचालकांना वाहने सावकाश चालवावी लागत आहेत.

# रायगडात ४६ धान खरेदी केंद्रांना मंजुरी

**रायगड : रामप्रहर वृत्त**

किमान आधारभूत किंमत धान खरेदी योजनेंतर्गत रायगड जिल्हा पणन अधिकारी यांच्या अखत्यारीत असलेल्या धानखरेदीदार संस्थांमार्फत ४६ खरेदी केंद्रावर धानाची (भाताची) खरेदी करण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी ही माहिती दिली.





अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांच्याकडील शासन निर्णयान्वये भात खरेदीचा खरीप पणन हंगाम कालावधी ३ नोव्हेंबर २०२५ ते ३१ मार्च २०२६, भरडधान्य खरीप पणन हंगाम कालावधी १ डिसेंबर २०२५ ते २८ फेब्रुवारी २०२६, तर रब्बी पणन हंगाम केंद्र शासनाकडून प्राप्त सूचनांनुसार असेल. भात खरेदीच्या वेळी शेतकऱ्यांनी आपल्याकडील जमिनीबाबतचा ७/१२चा उताऱ्याची व गाव नमुना ८(अ) ची छायाकिंतप्रत खरेदी केंद्रावर धान विक्रीकरिता आणणे आवश्यक आहे.

**आधारभूत किंमती (प्रति क्विंटल)**

भात सर्वसाधारण-दोन हजार ३६९ रुपये, भात (अ ग्रेड)-दोन हजार ३८९ प्रति क्विंटल, भरडधान्य ज्वारी (संकरित)-तीन हजार ६९९, ज्वारी (मालदांडी)-तीन हजार ७४९, बाजरी-दोन हजार ७७५, मका-दोन हजार ४००, नाचणी

धानाची खरेदी ही ऑनलाईन पद्धतीने होणार असल्याने संबधित शेतकऱ्यांची नोंदणी करणे आवश्यक राहील. या अनुषंगाने खरेदी केंद्रावर भात विक्रीकरिता आणताना प्रत्येक शेतकऱ्यांनी सोबत आपल्या आधारकार्ड व बँकेचे पासबुक आणणे आवश्यक आहे तसेच रोज सायंकाळी खरेदी केंद्र बंद झाल्यानंतर आणलेले, परंतु खरेदी न झालेले धान-भरडधान्य सांभाळण्याची जबाबदारी संबंधित शेतकऱ्यांचीच राहील. मंजुरी देण्यात आलेली धान खरेदी केंद्र अलिबाग, पेण, पनवेल, खालापूर, कर्जत, सुधागड, रोहा, श्रीवर्धन, माणगाव, महाड, पोलादपूर, म्हसळा तालुक्यात आहेत.

# सीकेटी कॉलेजमध्ये आंतर-महाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धा

### माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन; ४२२ स्पर्धकांचा सहभाग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालयात मुंबई विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतर-महाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धेला सोमवारी (दि. १७) उत्साहपूर्ण सुरुवात झाली. २२ नोव्हेंबरपर्यंत चालणाऱ्या या स्पर्धेत मुंबई विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमधील तब्बल ४२२ स्पर्धक सहभागी झाले आहेत.





स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे कार्यकारी संचालक आणि पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. मुंबई शहर झोन-१ सचिव डॉ. मनोज वर्मा, स्पर्धा सचिव डॉ. व्ही.बी. नाईक, मुंबई उपनगर सचिव डॉ. निलम पाटील आदी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी आयोजनाचे कौतुक करत स्पर्धेच्या माध्यमातून तरुणाईत खेळ संस्कृती अधिक भक्कम होण्यास मदत होईल, असे प्रतिपादन केले.

सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य तसेच मुंबई शहर झोन-१चे उपाध्यक्ष डॉ. एस. के. पाटील यांनी उपस्थित सर्व स्पर्धकांना शुभेच्छा देत उत्कृष्ट खेळभावना जपून खेळण्याचे आवाहन केले.

स्पर्धेत विविध वयोगटातील आणि वजनगटातील सामने सलगपणे होत असून खेळाडूंमध्ये मोठी उत्सुकता दिसून येत आहे. सीकेटी महाविद्यालयात दरवर्षी विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले जाते. त्यामध्ये बॉक्सिंग स्पर्धा ही विशेष उत्साहाने होणारी स्पर्धा असल्याचे आयोजकांनी सांगितले.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी जिमखाना विभागाचे चेअरमन डॉ. व्ही.बी. नाईक, सहसंचालक प्रा. अनिल नात्ती, प्रा. भरत जितेकर, प्रा. प्रतिज्ञा पाटील यांच्यासह सर्व सदस्य परिश्रम घेत आहेत. स्पर्धेचा समारोप व पारितोषिक वितरण समारंभ २२ नोव्हेंबर रोजी होणार आहे.

## अभिनंदन!



**पनवेल : रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलला मीमांसा स्कूल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. याबद्दल संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शाळेचे प्राचार्य अविनाश कुलकर्णी यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. या वेळी पीआरओ बाळासाहेब कारंडे, प्राचार्य स्वप्नाली म्हात्रे उपस्थित होते.**

# राष्ट्रपतींच्या हस्ते नवी मुंबई पालिकेस प्रथम क्रमांकाचा राष्ट्रीय जल पुरस्कार प्रदान

**नवी मुंबई : बातमीदार**

भारत सरकारचे जलशक्ती मंत्रालय आयोजित 'सहावा राष्ट्रीय जल पुरस्कार २०२४' मध्ये स्थानिक स्वराज्य संस्था श्रेणीत नवी मुंबई महानगरपालिकेस देशात प्रथम क्रमांकाचा राष्ट्रीय जल पुरस्कार आज विज्ञान भवन, नवी दिल्ली येथील विशेष समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक डॉ.कैलास शिंदे यांनी हा मानाचा पुरस्कार स्वीकारला.



या प्रसंगी व्यासपीठावर केंद्रीय जलशक्ती मंत्री सी.आर. पाटील, केंद्रीय जलशक्ती आणि रेल्वेराज्यमंत्री व्ही. सोमन्ना, केंद्रीय जलशक्ती राज्यमंत्री डॉ.राजभूषण चौधरी, केंद्रीय जलशक्ती मंत्रालय अंतर्गत जलसंसाधन, नदीविकास आणि गंगा पुनरूज्जीवन विभागाचे सचिव व्ही.एल कंथाराव आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाप्रसंगी अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे उपस्थित होते.

नवी मुंबई महानगरपालिकेची सुयोग्य जलवितरण प्रणाली आणि पाण्याचा पुनर्वापर अशा उल्लेखनीय बाबींचा विचार राष्ट्रीय जलपुरस्कारासाठी करण्यात आला. जलशक्ती मंत्रालय अंतर्गत जलसंपदा, नदीविकास आणि गंगा पुनरूज्जीवन विभागामार्फत देण्यात येणा–या या पुरस्काराकरिता देशभरातून ७५१ प्रस्ताव प्राप्त होते. त्या प्रस्तावांची जलसंपदा विभागाकडून तपासणी करण्यात आली तसेच केंद्रीय जल आयोग आणि केंद्रीय भूजल मंडळ यांनी प्रत्यक्ष भेटी देत पाहणी करून तपशीलवार अहवाल सादर केले. त्यानंतर स्वतंत्र निर्णायक मंडळाने पारदर्शक स्कोअरकार्ड प्रणाली वापरून त्रयस्थ ज्युरी समितीव्दारे मूल्यांकन केले. या मूल्यांकनाच्या आधारे विजेत्यांची निवड करण्यात आली असू स्थानिक स्वराज संस्था गटात नवी मुंबई महानगरपालिका देशात प्रथम क्रमांकाच्या राष्ट्रीय जलपुरस्काराची मानकरी ठरली आहे. त्याबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या या पुरस्कारप्राप्त यशामध्ये उल्लेखनीय जल व्यवस्थापन आणि पाण्याचा पुनर्वापर विषयक खालील महत्वाच्या बाबींची राष्ट्रीय पातळीवर दखल घेण्यात आलेली आहे. नवी मुंबई शहर स्वत:च्या मोरबे धरण प्रकल्पामुळे जलसमृध्द शहर असून पाण्याचा पुनर्वापर केला जात असल्याने पिण्याच्या पाण्याची लक्षणीय बचत होत आहे.

### पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे मिटरिंगद्वारे मोजमाप

नवी मुंबई शहर पाण्याच्या दृष्टीने स्वयंपूर्ण असल्याची विशेष नोंद परीक्षण समितीने घेतली.पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे मिटरींग पध्दतीव्दारे मोजमाप होत असल्याने जलवितरण प्रणाली सक्षम आहे. महानगरपालिकेमार्फत पारदर्शक आणि कार्यक्षम अशी सर्व डिजिटल पर्याय उपलब्ध असणारी बिलिंग प्रणाली कार्यान्वित आहे. त्यामुळे ९६%पर्यंत देयक वसूलीचे उत्तम प्रमाण आहे.

# रत्नागिरीमध्ये कार अपघातात दोघांचा मृत्यू, दोन जण गंभीर

**म्हसळा : प्रतिनिधी**

रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड तालुक्यात शिरगाव येथे मंगळवारी पहाटेच्या सुमारास एक भीषण कार अपघात झाला. वॅगनार कारचा ताबा सुटल्याने झालेल्या या दुर्घटनेत दोघांचा जागीच मृत्यू झाला असून दोघेजण गंभीर जखमी आहेत.



ही सर्व मंडळी नाशिक येथे नातेवाईकांकडे 'सोळा सोमवार' व्रताचे उद्यापन करून दापोलीकडे परत येत होती. पहाटेच्या सुमारास शिरगाव परिसरात त्यांच्या वॅगनार कारचा अपघात झाला.अपघाताचे वृत्तसमजताच आसपासच्या ग्रामस्थांनी तातडीने मदतकार्य सुरू केले. जखमींना मंडणगड ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, दोघांना तपासल्यानंतर डॉक्टरांनी मृत घोषित केले.

अपघाताते१)शंकर करमरकर (वय ५०) दापोली,२)हर्षदा जोशी (वय ७०) दोघांचा मृत्यू झाला तर प्रमोद मुकुंद लिमये (६०), ओंकार प्रमोद लिमये (३५), केळशी यादोघांची प्रकृती चिंताजनक असून त्यांना महाड येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# जनसेवा चॅरिटेबल ट्रस्टतर्फे मुलींना अत्याधुनिक स्वच्छतागृह



**चौक : प्रतिनिधी**

जनसेवा चॅरिटेबल ट्रस्ट चौक यांच्या वतीने मुलींसाठी अत्याधुनिक स्वच्छता गृह बांधून सर नोबत नेताजी पालकर विद्यामंदिर चौक यांना हस्तांतरण करण्याचा कार्यक्रम अध्यक्ष श्याम साळवी यांच्या हस्ते करण्यात आला.

जनसेवा चॅरिटेबल ट्रस्ट ही समाजसेवी उपक्रम राबविणारी आणि सामान्य माणसाला न्याय देण्यासाठी प्रयत्न करणारी संस्था आहे. सरनौबत नेताजी पालकर विद्यामंदिर व यशवंतराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालय चौक शाळेतील मुलींची संख्या जास्त असल्याने असलेले स्वच्छता गृह कमी पडत होते, त्यातच मुलींसाठी खास सोयी उपलब्ध नव्हत्या, याबाबत शाळेच्या संस्थेने जनसेवा चॅरिटेबल ट्रस्ट यांचे अध्यक्ष श्याम साळवी यांना अवगत केल्यावर त्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून पाच सिटचे अत्याधुनिक स्वच्छतागृह बांधुन दिले, यात मुलींसाठी खास सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

पावसात आलेल्या आपत्तीत कनिष्ठ महाविद्यालय इमारतीचे पत्रे उडून गेले होते, तेही एका दिवसात जनसेवा ट्रस्ट यांनी बसवून दिल्याचे संस्थेचे अध्यक्ष ड. अविनाश देशमुख यांनी सांगितले. यावेळी शाळेतील लहान मुलगी कार्तिकी माळी हिने आभार व्यक्त केले. विद्या प्रसारणी संस्थेच्या वतीने अध्यक्ष श्याम साळवी यांना मानपत्र देण्यात आले.

या वेळी कार्याध्यक्ष शोभाताई देशमुख, अ‍ॅड राजेंद्र मोरे, सचिन मते, प्रकाश जाधव, रामदास काईनकर, विष्णू खैर, विजय निरगुडा, प्रशांत खांडेकर, निखिल मालुसरे, राकेश कदम, व मुख्याध्यापक उपस्थित होते.

# स्नेहा मेहता होणार पोलादपूरच्या आठव्या नगराध्यक्ष

**पोलादपूर : प्रतिनिधी**

नगरपंचायत पोलादपूरच्या दुसऱ्या पंचवार्षिक निवडणुकीनंतर महिला आरक्षणाच्या रिक्त नगराध्यक्षपदासाठी उर्वरित वर्षभराच्या कार्यकाळातील सहा महिन्यासाठी मंत्री भरत गोगावले यांच्या निर्देशानुसार स्नेहा सचिन मेहता यांचा एकमेव उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला आहे. यामुळे गेल्या नऊ वर्षांतील आठवे नगराध्यक्षपद स्नेहा मेहता यांना मिळणार हे स्पष्ट झाले आहे.



शिवसेना कोअर कमिटी सदस्य विकास गोगावले, महिला आघाडी नेत्या सुषमाताई गोगावले, दक्षिण रायगड सहसंपर्कप्रमुख चंद्रकांत कळंबे, तालुकाप्रमुख निलेश अहिरे, शहरप्रमुख सुरेश पवार यांच्या एकत्रित निर्णयानुसार शेवटच्या दीड वर्षाच्या कालावधीत शिल्पा दरेकर यांना सातवे नगराध्यक्ष पद, स्नेहा मेहता यांना आठवे नगराध्यक्षपद, तर अस्मिता उमेश पवार यांना तिर्सऱ्या पंचवार्षिक निवडणुकीला सामोरे जाताना नववे नगराध्यक्षपद देण्याचा निर्णय घेण्यात आला.

शिवसेना पक्ष संघटनेच्या निर्णयानुसार शिल्पा देवेंद्र दरेकर यांच्या राजीनाम्यानंतर रिक्त नगराध्यक्षपदासाठी स्नेहा मेहता यांचे एकमेव नामनिर्देशन पत्र १८ नोव्हेंबर रोजी दाखल करण्यात आले.

# अलिबागमध्ये आठ अर्ज बाद

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग नगरपालिका निवडणूक प्रक्रियेत आज नगराध्यक्षपदाचा एक तर नगरसेवकपदासाठीचे सात उमेदवारी अर्ज छाननीत बाद झाले, मात्र अर्ज बाद झालेल्यांमध्ये प्रमुख उमेदवारांचा समावेश नाही. त्यामुळे सर्वच राजकीय पक्षांनी सुटेकचा निःश्वास सोडला आहे.

उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत नगराध्यक्षपदासाठी सहा, तर नगरसेवकपदाच्या २० जागांसाठी ७४ उमेदवारी अर्ज दाखल झाले.

# नियम मोडणाऱ्या वाहनांवर कारवाई

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

जिल्ह्यात वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. रायगड जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी (दि.१७) वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण २१७ व्यक्तींवर कायदेशीर कारवाई केली. वाहतूकीचे नियम भंग केल्याप्रकरणी त्यांच्याकडून दोन लाख २२ हजार दंड आकारला आहे.

# महात्मा फुले मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रशांत देशमुख यांची निवड

**खालापूर : रामप्रहर वृत्त**

अखिल भारतीय मराठी साहित्य संशोधन परिषद व जगतगुरु तुकोबाराय साहित्य परिषद आयोजित १८ वे राज्यस्तरीय महात्मा फुले प्रबोधन मराठी साहित्य संमेलन खानवडी (ता. पुरंदर) येथे २७ नोव्हेंबर २०२५ रोजी होणार आहे. या संमेलनाच्या अध्यक्षपदी रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यातील हातनोली (चौक) येथील प्रशांत देशमुख यांची तर स्वागताध्यक्ष पदी गौरव कोलते यांची निवड करण्यात आली आहे. अशी माहिती संमेलनांचे मुख्य संयोजक व ज्येष्ठ साहित्यिक दशरथ यादव यांनी दिली.



महात्मा फुले यांचे मूळ गाव असलेल्या कऱ्हा नदीच्या काठावरील खानवडी येथे दरवर्षी साहित्य संमेलनाचे आयोजन केले जाते. संमेलनात उद्घाटन समारंभ, कथाकथन, ग्रंथदिंडी, नाट्यप्रयोग, कविसंमेलन असे भरगच्च कार्यक्रम होणार आहेत. संमेलनाला प्रमुख पाहूणे म्हणून प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रवक्ते सूरज चव्हाण, आमदार विजय शिवतारे, माजी आमदार संजय जगताप, पुणे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष विजय कोलते, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ दिगंबर दुर्गाडे, भाजपचे नेते बाबाराजे जाधवराव, ज्येष्ठ साहित्यिक डॉ जयप्रकाश घुमटकर आदी उपस्थित राहणार आहेत.

संमेलनाध्यक्ष प्रशांत देशमुख हे शिव व्याख्याते असून त्यांनी शेकडो व्याख्यानातून समाजाचे प्रबोधन केले आहे. गुड मॉर्निंग, जय शिवराय या पुस्तकाचे लेखन त्यांनी केले आहे. गौरव कोलते हे गेली पंधरा वर्षे सामाजिक व राजकीय क्षेत्रात काम करीत असून आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठानचे संचालक आहे.

# हिंदू जनजागृती समितीच्या मोहिमेत धर्मप्रेमी युवक–युवतींचा उत्स्फूर्त सहभाग

**पेण : रामप्रहर वृत्त**

इतिहास, संस्कृती आणि राष्ट्रभावनेची जपणूक हा उद्देश ठेऊन हिंदु जनजागृती समितीच्या वतीने गडसंवर्धन मोहीम किल्ले सांकशी (ता. पेण) येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या मोहिमेत ८० हून अधिक युवक–युवतींनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.



सुनील कदम या वेळी मार्गदर्शन करताना म्हणाले, 'छत्रपती शिवाजी महाराजांनी राष्ट्र आणि धर्मरक्षणासाठी केलेल्या महान कार्यातून राष्ट्र आणि धर्मकार्य करण्याची प्रेरणा मिळावी तसेच गडांचे ऐतिहासिक महत्त्व आणि संवर्धन याबद्दल जनजागृती व्हावी हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. रायगड जिल्ह्याला ऐतिहासिक महत्त्व आहे. गड–किल्ले मोहिमेत सहभागी झाल्यावर आपली क्षमता कळते तसेच ती वाढवण्याची प्रेरणाही मिळते. छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांचे आदर्श ठेऊन कृती करूया'.

# जवाहर नवोदय विद्यालयात बिरसा मुंडा जयंती साजरी

**माणगाव : बातमीदार**

पीएमश्री स्कूल जवाहर नवोदय विद्यालय निजामपूर येथे बिरसा मुंडा यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. प्राचार्य डॉ. प्रशांत राघमवार यांच्या हस्ते बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून दीप प्रज्वलनाने कार्यक्रमास सुरुवात झाली. स्वरा सोनकांबळे,हर्ष दळवी, भक्ती जगताप, स्वरा गायकवाड,आराध्य अलिबागकर, अनिकेत गांगुर्डे या विद्यार्थ्यांनी तसेच ज्ञानेश्वर राऊत, सुनिता जैसवार या शिक्षकांनी बिरसा मुंडा यांच्या विषयी आपले विचार प्रकट केले.

मायग्रेशन विद्यार्थिनींनी आदिवासी नृत्य सादरीकरण केले. प्राचार्य डॉ. राघमवार यांनी सांगितले की, भगवान बिरसा मुंडा यांच्या विचारांचे आचरण झाले पाहिजे.

# माथेरान नगरपालिका निवडणुकीसाठी छाननी प्रकिया पूर्ण; दोन अर्ज बाद

**माथेरान : बातमीदार**

माथेरान नगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक दोन डिसेंबर रोजी होणार आहे. या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सोमवार दि.१७ रोजी पूर्ण झाली.नगराध्यक्ष पदासाठी एकूण चार अर्ज दाखल झाले, तर नगरसेवक पदासाठी एकूण ७४ अर्ज दाखल झाले. या सर्व नामनिर्देशनपत्रांची दि.१८ रोजी छाननी प्रकिया पूर्ण झाली असून नगराध्यक्ष पदाचे दोन अर्ज बाद करण्यात आले असून दोन अर्ज वैद्य ठरविण्यात आले आहेत तसेच नगरसेवक पदाचे देखील दोन अर्ज बाद करण्यात आले असून ७२ अर्ज वैद्य ठरविण्यात आले आहेत.

माथेरान नगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी १० नोव्हेंबर पासून नामनिर्देशन पत्र दाखल करण्यास सुरुवात झाली होती.सुरवातीचे चार दिवस एकही नाम निर्देशन पत्र दाखल झाले नव्हते.त्यानंतर मात्र सर्व राजकीय पक्षांची मोर्चेबांधणी सुरू झाल्यावर सगळ्या युत्या आघाड्यांचे चित्र स्पष्ट होण्यास सुरुवात झाल्या नंतर उमेदवारी अर्ज भरण्याचा वेग वाढलेला दिसत होता.नामनिर्देशनपत्र भरण्याच्या शेवटच्या दिवशी नगराध्यक्ष पदासाठी ४ आणि नगरसेवक पदासाठी ७४ अर्ज प्राप्त झाले.मंग.दि.१८ रोजी नगरपालिका आवारात निवडणूक निर्णय अधिकारी सुरेंद्र सिंह ठाकूर,सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी राहुल इंगळे,निवडणूक नायब तहसिलदार गोविंद कोढंबे यांच्या उपस्थितीत अर्जांची छाननी प्रकिया पूर्ण झाली

यामध्ये नगराध्यक्ष पदाचे दोन अर्ज बाद करण्यात आले असून दोन अर्ज वैद्य ठरविण्यात आले.तसेच नगरसेवक पदाचे देखील दोन अर्ज बाद करण्यात आले असून ७२ अर्ज वैद्य ठरविण्यात आले आहेत.यावेळी उमेदवार आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी गर्दी केली होती.

# श्रीवर्धन नगर परिषदेमध्ये २० जागांसाठी ६८ उमेदवार

## नगराध्यक्षपदासाठी पाच उमेदवार; अर्ज माघारीकडे लक्ष

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन नगरपरिषद निवडणूक २०२५ साठी च्या दिवशी अर्जांचा अक्षरशः पाऊस पडला. २० सदस्य पदांसाठी ६८ उमेदवार, तर नगराध्यक्षपदासाठी पाच उमेदवारांनी अर्ज दाखल करून निवडणुकीची रंगत शिगेला पोचवली. निवडणूक निर्णय अधिकारी तहसीलदार महेंद्र वाकलेकर, सहाय्यक अधिकारी जीवन पाटील व मनोज माने यांच्या उपस्थितीत कार्यवाही पार पडली.

नगराध्यक्षपदासाठी सातनाक जितेंद्र प्रभाकर – राष्ट्रवादी काँग्रेस, श्रीवर्धनकर अक्षता प्रितम – शिवसेना, चौगुले अतुल अरविंद – शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट), चौलकर रवींद्र पोशा – राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), घोडमोडे रामचंद्र शांताराम – अपक्ष

प्रभाग १मध्ये १ अ – गुरव अनंत लक्ष्मण (राष्ट्रवादी काँग्रेस), राणे यशवंत विनायक (शिवसेना), करडे आंबिका सुरेश (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) तर १ ब – वैद्य शमा रजनीकांत (राष्ट्रवादी काँग्रेस), भोसले वैदेही वेभव (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट), भोईणकर प्रणाली अकेश (शिवसेना), वाघे वैशाली रामदास (शिवसेना)



प्रभाग २ मध्ये २ अ – उघडा गणपत हरि (शिवसेना), चौले पांडुरंग दामोदर (राष्ट्रवादी काँग्रेस – शरद पवार गट), वाघे हरिदास पांडुरंग (राष्ट्रवादी काँग्रेस) तर २ ब – मदन तेजस्विनी प्रथमेश (शिवसेना), वाघे प्रजनी परेश (राष्ट्रवादी काँग्रेस), दिवेकर शबनम समद (शरद पवार गट), पाटील सुविधा विराज (शिवसेना)

प्रभाग ३ मध्ये ३ अ – माळी प्रतिक्षा जितेंद्र (राष्ट्रवादी काँग्रेस) तर ३ ब – कोसबे अमेय अरुण (राष्ट्रवादी काँग्रेस), करडे गोदावरी सुरेश (शिवसेना–उबाठा), भोकरे सुजित रमाकांत (शिवसेना)

प्रभाग ४ मध्ये ४ अ – चोगले सुप्रिया कैलास (भारतीय जनता पक्ष), येलवे दिपाली सचिन (शिवसेना–उबाठा), लतिका लव पाटील (शिवसेना) तर ४ ब – कदम अनुष्का जितेंद्र (राष्ट्रवादी काँग्रेस), वेश्वीकर संतोष अरुण (शिवसेना), भोकरे सुजित रमाकांत (शिवसेना–उबाठा)

प्रभाग ५ मध्ये ५ अ – पाब्रेकर साक्षी स्वप्निल (राष्ट्रवादी काँग्रेस), श्रीवर्धनकर साक्षी रामचंद्र (राष्ट्रवादी काँग्रेस), श्रीवर्धनकर विजया विलास (शिवसेना), श्रीवर्धनकर संचिता सुकुमार (शिवसेना) तर ५ ब – बोरकर प्राविल चंद्रकांत (भारतीय जनता पक्ष), चाफेकर शिवराज संदीप (शिवसेना–उबाठा), मयेकर रूपेश शांताराम (अपक्ष)

प्रभाग ६ मध्ये ६ अ – मुरकर राजश्री रितेश (राष्ट्रवादी काँग्रेस), चांदविडकर अचिता सुनील (शिवसेना), करडे गोदावरी सुरेश (शिवसेना–उबाठा), चौलकर रश्मी रवींद्र (शरद पवार गट) तर ६ ब – विचारे प्रसाद सुरेश (राष्ट्रवादी काँग्रेस), राऊत विक्रांत चंद्रकांत (शिवसेना), टोलकर मुझामिल मुक्त्यार (काँग्रेस)

प्रभाग ७ मध्ये ७ अ – चौले शिवानी हेमंत (राष्ट्रवादी काँग्रेस), पाटील पायल नंदकुमार (शिवसेना–उबाठा), कदम विद्या विलास (शरद पवार गट) तर ७ ब – राजपुरकर इप्तिखार शेख अहमद (राष्ट्रवादी काँग्रेस), सरखोत मुईद मेहमूद (शिवसेना–उबाठा), दुस्ते जुनेद निसार (शिवसेना–उबाठा), हद्ददि सुफियान रशीद (शरद पवार गट)

प्रभाग ८ मध्ये ८ अ – सरखोत शबिस्ता सैफुदिन (राष्ट्रवादी काँग्रेस), काळोखे सायमा अ. सलाम (शरद पवार गट) तर ८ ब – साठविलकर समीर इस्माईल (राष्ट्रवादी काँग्रेस), बेवनाक फुझेल फारूक (शरद पवार गट), लुमण उदय प्रभाकर (शिवसेना)

प्रभाग ९ मध्ये ९ अ – गोरनाक बाळकृष्ण काशिनाथ (राष्ट्रवादी काँग्रेस), बाक्कर कुमार गणपत (शिवसेना) तर ९ ब – माने प्राविता मिलिंद (राष्ट्रवादी काँग्रेस), जाधव ऐश्वर्या मनोज (शिवसेना), भोसले वैदेही वैभव (शिवसेना–उबाठा)

प्रभाग १० मध्ये १० अ – मांडवकर गुलाब महेंद्र (राष्ट्रवादी काँग्रेस), भगत पुनम प्रकाश (शिवसेना) तर १० ब – मांजरेकर भावेश विश्वनाथ (राष्ट्रवादी काँग्रेस), भाटकर अंजिकेश अशोक (शिवसेना–उबाठा), चौले शिवराज दिलीप (शरद पवार गट) ६८ उमेदवार आणि २० प्रभागांमुळे श्रीवर्धनची निवडणूक तिरंगी–चौकडी लढतींकडे झुकली असून नगराध्यक्षपदावर पाच जणांची थेट टक्कर स्थानिक राजकारणात प्रचंड रंगत आणणार आहे. आता सर्वांचे लक्ष अर्ज माघारीकडे आहे.

# अनधिकृत आठवडा बाजारांना दणका

## पनवेल महापालिका करणार कारवाई ■ आयुक्तांचे संबंधित विभागाला आदेश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात भरविल्या जाणाऱ्या अनधिकृत आठवडा बाजारसंदर्भात पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधानसभेत प्रश्न उपस्थित केला होता. त्यानंतर महापालिकेच्या वतीने या अनधिकृत आठवडा बाजारांवर अतिक्रमण विभागाच्या वतीने कडक कारवाई करून सर्व अनधिकृत आठवडा बाजार बंद करण्यात आले होते.

गेल्या काही दिवसांपासून पुन्हा एकदा अनधिकृतपणे आठवडा बाजार भरविण्यात येत असल्याचे दिसून येत आहे. महापालिका कार्यक्षेत्रातील चारही प्रभागातील या अनधिकृत आठवडा बाजारांवर कडक कारवाई करण्याचे निर्देश आयुक्त मंगेश चितळे प्रभाग अधिकाऱ्यांना दिले आहेत.

अनधिकृत आठवडा बाजारासाठी आलेल्या फेरीवाले, हातगाड्यांवर तोडक कारवाई करून व बाजार बंद करण्याचे आदेश आयुक्तांनी दिले असल्याने पुन्हा एकदा अनधिकृतपणे आठवडा बाजारांवर अतिक्रमण विभागाच्या वतीने कडक कारवाई होणार आहे. याची सर्व संबंधितांनी दखल घ्यावी, असे महापालिकेच्या वतीने कळविण्यात येत आहे.

# ज्येष्ठ नागरिकांना मालमत्ता करात सवलतीचा दावा खोटा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ज्येष्ठ नागरिकांना मालमत्ता करात ३० टक्के सूट मिळणार असल्याचा दावा करणारा एक संदेश मागील काही दिवसांपासून समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणावर प्रसारित होत आहे. याबाबत सातत्याने चौकशी केली जात आहे, मात्र हा संदेश पूर्णपणे बनावट असल्याचे स्पष्टीकरण



पनवेल महानगरपालिकेने दिले आहे तसेच ज्येष्ठ नागरिकांनी याबाबत चौकशीसाठी विभाग कार्यालयात येऊ नये, असे आवाहन पालिकेने केले आहे.

महापालिकेने स्पष्ट केले की, ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या निवासी मालमत्तेसाठी मालमत्ता करात ३० टक्के सवलत देण्यासंदर्भात महानगरपालिका अधिनियमामध्ये कोणतीही तरतूद नाही. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांना मालमत्ता करात ३० टक्के सूट मिळणार नसल्याचे पालिकेच्या वतीने सांगण्यात आले आहे.

## निवडक

### वाहनाच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

**पनवेल :** अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत एका तरुणाचा मृत्यू झाला. या अपघाताप्रकरणी वाहनचालकाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात १८ नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. १८ नोव्हेंबर रोजी मध्यरात्री तीनच्या सुमारास महिंद्रा शोरूम समोरील पुणे-मुंबई हायवेवर ३० ते ३५ वर्षीय अनोळखी व्यक्तीला अज्ञात वाहनाने धडक देत अंगावरून गाडी गेली. या अपघातात तो जखमी होऊन त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस अधिक तपास करत आहेत.

### हरवलेल्या व्यक्तीचा शोध

**पनवेल :** घरातून कोणास काही एक न सांगता घराबाहेर पडलेला व्यक्ती अद्यापही घरी परत न आल्याने तो हरवल्याची



तक्रार उलवे पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. आरीफुल हक खोसचाँद शेख (वय ३३ वर्ष) असे या व्यक्तीचे नाव आहे. त्याची उंची ५.७ इंच, बांधा मजबुत, रंग काळा, चेहरा- गोल, केस काळे, नाक लांब, डोळे काळे, पायात स्पिलर, अंगात-फिकट निळा शर्ट व काळी पॅन्ट असून त्याला हिंदी भाशा बोलता येथे या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी उलवे पोलीस ठाणे किंवा पोलीस हवालदार विकी लॉजरेस यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### मयत व्यक्तीच्या नातेवाईकांचा शोध

**पनवेल :** तळोजा पोलीस ठाण्यात एक व्यक्ती बेशुद्ध अवस्थेत सापडल्याची तक्रार देण्यात आली होती. त्यानुसार त्या व्यक्तीस उपचारासाठी पनवेल उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आले. तेव्हा त्यास मयत घोषित करण्यात आले. मयत व्यक्तीचे नाव काशिनाथ (वय ७०, मुळ रा. कोल्हापूर) असून उंची पाच फूट दोन इंच, रंग सावळा, चेहरा उभट आहे. अंगात निळी पॅन्ट, पायात काळी सॅन्डल, उजव्या पायास जुनी जखम आहे. या व्यक्तीबाबत कोणास माहिती असल्यास त्यांनी तपासी अंमलदार रत्नाकर पाटील (९५९४३०५८३४) यांच्याशी संपर्क साधावा.

# पनवेलमधील रस्त्यांच्या दुरूस्तीमुळे नागरिकांना दिलासा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्या आदेशानुसार चारही प्रभागातील रस्ते दुरुस्तीची कामे जोमाने सुरू केली आहेत. रस्त्यांच्या दुरुस्तीमुळे नागरिकांना निश्चितच दिलासा मिळत आहे.

गेल्या काही दिवसांपासून अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे स्वतः संपूर्ण शहरांतील रस्ते दुरुस्तीच्या कामाचा आढावा घेत आहेत. मंगळवारी शहर अभियंता संजय कटेकर व कार्यकारी अधिकारी सुधीर साळुंखे यांनी आदई तलाव परिसरातील





रस्ते दुरुस्तीच्या कामाची पाहणी केली.

महापालिका क्षेत्रातील चारही प्रभागातील रस्ते दुरुस्तीच्या कामे वेगाने सुरू आहेत. आदई तलाव परिसर हा अत्यंत वर्दळीचा आहे. याठिकाणी रस्त्यामुळे होणारी नागरिकांची गैरसोय लक्षात घेऊन लवकरात लवकर कामे पूर्ण करण्याच्या सूचना शहर अभियंता संजय कटेकर यांनी पहाणीवेळी कनिष्ठ अभियंत्यांना दिल्या. याच बरोबर नवीन पनवेलमधील विविध ठिकाणी सुरू असलेल्या रस्त्याच्या कामाचीदेखील त्यांनी पाहणी केली.

कनिष्ठ अभियंत्यांना दिलेल्या आदेशानुसार रात्रंदिवस रस्ते दुरुस्तीच्या कामे सुरू आहेत. सध्या खारघरमधील थ्री स्टार हॉटेल रस्ता, सेक्टर ३४ बँक ऑफ इंडिया जवळील रस्ते, कळंबोलीमध्ये ३ई मधील रस्ते, नवीन पनवेलमधील रस्ते, कामोठे सेक्टर ३४ मधील मुख्य रस्ता, अशा विविध ठिकाणी रस्ते दुरुस्तीची कामे वेगाने सुरू आहेत.





**पनवेल : येथील प्रसिद्ध पोटे मसाले कुटुंबियातील निलेश पोटे यांचे सुपुत्र प्रेम यांचा विवाह नुकताच सोनिया सर्वेश दलाल हिच्याशी झाला. या वेळी वधू-वरांना शुभेच्छा देण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्यासमवेत माजी पं.स. सदस्य निलेश पाटील, भाजप शहराध्यक्ष सुमित झुंझारराव, संजय जैन, पत्रकार संजय कदम, राकेश पोटे आदी उपस्थित होते.**

# खारघरच्या रामशेठ ठाकूर महाविद्यालयात 'युवा स्टार्ट-अप सूत्र'

## आंतर महाविद्यालयीन स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मंगळवारी (दि.१८) अकाउंट व फायनान्स विभाग व एनएमसीए यांच्या संयुक्त विद्यमाने संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सव वर्षनिमित्त 'युवा स्टार्ट-अप सूत्र' आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेमध्ये नवी मुंबई आणि मुंबई येथील २७ महाविद्यालयांमधील एकूण ६० स्पर्धकांनी उत्साहात सहभाग नोंदवला. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून सुमित म्हात्रे (एचओसी पिल्लई रसायनी) आणि प्रा. डॉ. निलेश कोळी (सीकेटी महाविद्यालय न्यू पनवेल) यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक, विद्यानलकार स्कूल ऑफ आयटी वडाळा, कृषिका नांद्राज व तिच्या टीमने



स्मार्ट इ एम जी आधारित प्रोस्थेटिक हँड प्रकल्पासाठी पटकाविला, द्वितीय क्रमांक, काळसेकर महाविद्यालय ठाणे, सोहैल खान व त्याच्या टीमने ऑडीफाय प्रकल्पासाठी पटकाविला व तृतीय क्रमांक, एस.के. टिळक महाविद्यालय, सीवूड राजनीश पांडे - इंटरव्ह्यू प्रिपरेशन हब ह्याने पटकाविला तसेच उत्तेजनार्थ ही पारितोषिके देण्यात आली त्यामध्ये देव गर्ग - के इ एस श्रॉफ महाविद्यालय, कांदिवली व मेहेक माहीमकर, रामशेठ ठाकूर महाविद्यालय खारघर यांचा समावेश होता.

या कार्यक्रमासाठी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय टी देशमुख, संस्थेचे कार्यकारी मंडळाचे सदस्य अ‍ॅड. राहुल घरत, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडादे सर, हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते तसेच यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना व शिक्षकांना मार्गदर्शन व सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे व विजेत्यांचे अभिनंदन केले. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे, प्रा. प्रथमेश उदेकर समन्वयक, अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष तसेच रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका निशा नायर व सर्व विभागप्रमुख या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

या स्पर्धेचे आयोजन प्रा. डॉ. प्रवर शर्मा अकाउंट व फायनान्स विभाग प्रमुख यांनी केले तसेच प्रा. करिष्मा कडव, प्रा. श्वेतांबरी बोठे, प्रा. आनंद शेलार शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी स्वयंसेवक यांनी उपस्थित राहून सहकार्य केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. योगिता पाटील यांनी केले तसेच कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांचे आभार मानले.

# हिंदू जनजागृती समितीतर्फे नवीन पनवेल येथे प्रथमोपचार शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हिंदू जनजागृती समितीच्या वतीने नवीन पनवेलमध्ये रविवारी (दि.१६) प्रथमोपचार प्रशिक्षण आणि त्याचे दैनंदिन जीवनातील महत्त्व या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले.

प्रत्येक नागरिकाला प्रथमोपचाराचे प्रशिक्षण असणे आवश्यक आहे. यादृष्टीने ठिकठिकाणी त्याविषयीचे प्रशिक्षण वर्ग घेतले जातात. याचाच एक भाग म्हणून पनवेल येथे प्रथमोपचार प्रशिक्षण वर्गाचे आयोजन केले होते.

या प्रवचनात रुग्णाची नाडी पडताळणी कशी करावी, पालथा रुग्ण सरळ कसा करावा, रुग्णाची प्राथमिक तपासणी कशी करावी याची प्रात्यक्षिके



दाखवण्यात आले.

तसेच अगंतुक वस्तू घशामध्ये अडकली असता उपचार कसा करावा, पायाचा घोटा मुरगळला असता RICE (प्रथमोपचारची एक पद्धत) पद्धतीने उपचार कसा करावा, याचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले.

अशा प्रकारचे ज्ञान घ्यायला आम्हाला आवडेल. या ज्ञानामुळे आम्ही स्वतः च्या कुटुंबातील व्यक्ती व इतरांना सहाय्य करू शकतो, असे शिबिरार्थींनी सांगितले. या शिबिराचा १५ जणांनी लाभ घेतला.

# उरणमधील फुंडे विद्यालयात इंट्रॅक्टिव्ह पॅनलचे प्रशिक्षण

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय फुंडे येथे इंट्रॅक्टिव्ह पॅनलचे प्रशिक्षण सर्व अध्यापकांना देण्यात आले.

या कार्यक्रमाला रयत शिक्षण संस्था, रायगड विभागाचे विभागीय अधिकारी एम. के. कोंगेरे उपस्थित होते. तसेच लेखनिक वैभव गावंड सर, प्रशिक्षक मीनल मावळ विद्यालयाचे प्राचार्य बी. बी.साळुंखे, उपप्राचार्य एस. डी. थोरात, पर्यवेक्षिका एस. एम. बाबर, तसेच एस. एस.पाटील, विद्यालयाचे वरिष्ठ लेखनिक नितीन म्हात्रे, नवनीत ठाकूर सर.जुनिअर कॉलेज विभाग प्रमुख श्री.पाटोळे सर आणि कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय पिरकोन, पंचरत्न इंग्लिश मेडीयम पिरकोन, तसेच छत्रपती शिवाजी विद्यालय जासई, तु. ह. वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय फुंडे या सर्व विद्यालयातील एकूण (१०२) मुख्याध्यापक, उपमुख्याध्यपक, पर्यवेक्षक, शिक्षक, बंधू भगिनी उपस्थित होते.

प्रास्ताविक उपशिक्षक एच. एन. पाटील यांनी केले तसेच रायगड विभागाचे विभागीय अधिकारी आदरणीय एम. के. कोंगेरे साहेब यांनी मार्गदर्शन केले. रयत शिक्षण संस्था ही आशिया खंडातील सर्वात मोठी व नामांकित शिक्षण संस्था असून



या रयत शिक्षण संस्थेमधील कोणताही विद्यार्थी तसेच सेवक हा काळाच्या बरोबर मागे न राहता तो बदलत्या काळाबरोबर आणि ए आय तसेच येणाऱ्या नवीन प्रवाहा बरोबर टिकून राहण्यासाठी रयत शिक्षण संस्था नेहमीच अग्रेसर असते. रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, सचिव मेनकुदळे, सहसचिव बंडू पवार, यांच्या मार्गदर्शनाने अध्यापना मध्ये प्रभावी अध्यापन होण्याकरिता अध्यापकांना इंट्रॅक्टिव्ह बोर्डच्या माध्यमातून अध्यापन कसे करावे याबाबत प्रशिक्षण देण्यात आले.

प्रशिक्षक मिनल मावळ यांनी इंट्रॅक्टिव्ह बोर्डची सविस्तर माहिती दिली. तसेच प्रशिक्षणार्थींच्या शंकाचे निरसन केले. प्रशिक्षणास विशेष सहकार्य उपशिक्षक एस. डी. नाईक व पी. ए. पाटील यांचे लाभले.

# चोरीची बाईक नाकाबंदीत सापडली

**पनवेल :** तळोजा वाहतूक पोलीस हद्दीमध्ये वाहतूक नियमन करीत असताना एका दुचाकी चालकाला थांबवण्याचा प्रयत्न केला असता दुचाकी चालक पळून गेला. या वेळी तो चालवत असलेली दुचाकी चोरीची असल्याचे समोर आले व मालकाच्या ताब्यात दुचाकी दिली.

वाहतूक पोलीस पोहवा डावकरे व पोशी देवकते हे आरएएफ सिग्नल येथे वाहतुकीचे नियमन करीत होते. या वेळी पनवेच्या दिशेने आलेली एक दुचाकी (एचएच २४ एएम ६८७३) या दुचाकीवरील चालक व त्याच्या पाठीमागे बसलेल्या व्यक्तीची हालचाल ही वाहतूक पोलिसांना संशयितरित्या वाटली. या दरम्यान देवकाते व डावकारे यांनी त्या दुचाकी चालकांना थांबवण्याचा प्रयत्न केला, मात्र त्या दोघांनी ती मोटरसायकल जागेवरच सोडून पळून गेले.

या वेळी ही माहिती वरिष्ठ अधिकारी यांना माहिती देऊन त्या दुचाकीची सर्व माहिती काढली व मूळ मालकाचा शोध लावून दुचाकी मालक ओंकार गायकवाड यांना तळोजा येथे बोलावले व तळोजा पोलीस ठाण्यात ती दुचाकी पुढील कारवाईसाठी देण्यात आली. याबाबत चोरीला गेलेली दुचाकी सापडल्याने मालक गायकवाड यांनी वाहतूक पोलिसांचे आभार मानले.

# नेरे, नवीन पनवेल येथे बाल दिनानिमित्त कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अमरदीप बाल विकास फाउंडेशनतर्फे अमरदीप दिवाळी उपक्रमांतर्गत बाल दिनाचे औचित्य साधून नेरे- नवीन पनवेल येथील गिरीजा फाउंडेशन संचालित आश्रमा मध्ये बालकांना शैक्षणिक साहित्य व वृद्धांना बेडशीट वाटप करण्याचा कार्यक्रम नुकताच झाला.

या वेळी जादूगार शिंदे यांनी चित्तथराक जादूचे प्रयोग सादर करून सर्व उपस्थितांना अचंबित केले. आश्रमातील चिमुकल्यांच्या कलाविष्काराचे सादरीकरण झाले. नामवंत गायक सुनील वाडकर, डॉ. विजय मोरे, अशोक डिका आणि दिपक कदम यांनी हिंदी व मराठी गीते सादर करून कार्यक्रम एका उंचीवर नेला. ज्येष्ठ अभिनेत्री उर्मिला डांगे यांनी एकपात्री नाट्य प्रवेश सादर करून कार्यक्रमात रंगत आणली. तर शब्दश्री विलास देवळेकर यांनी आपली इकोमय काव्यरचना आगळ्यावेगळ्या शैलीत पेश केली.



कार्यक्रमाचे प्रास्तविक संस्थेचे संस्थापक एन.डी.खान यांनी केले. गिरीजा फाउंडेशनच्या हर्षदा सपलिंग यांनी संस्थेच्या वाटचालीचा थोडक्यात आढावा घेतला. डॉ.स्वरांजली गायकवाड यांनी उत्तम सूत्रसंचालन केले तसेच त्यांनी Clapping therapyची प्रात्यक्षिके उपस्थिताकडून करून घेतली. या कार्यक्रमात अभिनेत्री उर्मिला डांगे, लता सोनवणे, झाकिर पालेकर, पाकीजा अत्तार, रेश्मा अत्तार, श्रेया भणगे, नानजीन पालेकर, शब्दश्री विलास देवळेकर, एच.एन. पाटील, पूजा मंडोरा, वैशाली पाटील, शशिकांत पाटील, अमित शिंदे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. तसेच जेष्ठ नागरिक आणि चिमुकल्यांची उपस्थिती लक्षणीय होती.

कार्यक्रमाच्या संयोजन सलमा खान यांनी मोठ्या कल्पकतेने केले. गिरीजा फाउंडेशनच्या संचालिका सुनंदा संपलिंग आणि व्यवस्थापक गोपाळ संपलिंग यांचे कार्यक्रमास विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी राजकुमार ताकमोगे, मीना ताकमोगे, गिरजा फाऊंडेशनचे केयरटेकर हासिब शेख व कर्मचारीवर्ग यांनी विशेष परिश्रम घेतले. सामूहिक राष्ट्रगीत गायनानंतर या सुरेल कार्यक्रमाची सांगता झाली.

## संपादकीय

# राजकारण की न्याय?

बांगलादेशात येत्या फेब्रुवारी महिन्यात संसदीय निवडणूक होणार आहे. बांगलादेशच्या पदच्युत पंतप्रधान शेख हसीना यांच्या अवामी लीग पक्षाला या निवडणुकीत भाग घेण्यास मनाई करण्यात आली आहे. या निवडणुकीच्या नेमके काही महिने आधी बांगलादेशच्या आंतरराष्ट्रीय गुन्हे लवादाने शेख हसीना आणि माजी गृहमंत्री असदुज्ज्मान खान कमाल या दोघांना मृत्यूदंडाची शिक्षा सुनावली आहे हे लक्षात घ्यावे लागेल.

**बांगलादेशच्या आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधिकरणाने त्या देशाच्या पदच्युत पंतप्रधान शेख हसीना आणि माजी गृहमंत्री असदुज्ज्मान खान कमाल या दोघांना मृत्यूदंडाची शिक्षा सुनावली आहे. बांगलादेशमध्ये गेल्या वर्षी झालेल्या हिंसक विद्यार्थी आंदोलनादरम्यान शेकडो निदर्शक मृत्यूमुखी पडले. यामागे हसीना याच मुख्य सूत्रधार होत्या असा आरोप त्यांच्याविरोधात करण्यात आला होता. हसीना व असदुज्ज्मान या दोघांच्याही अनुपस्थितीत विशेष लवादासमोर सुनावणी पार पडली व विद्यार्थी आंदोलनादरम्यान मानवतेविरुद्ध केलेल्या गुन्ह्यांसाठी शेख हसीना व असदुज्ज्मान खान कमाल यांना ही शिक्षा सुनावण्यात आली आहे. आपल्याविरोधातील विद्यार्थ्यांची निदर्शने हा अमेरिकेने रचलेला आणि पाकिस्तानने घडवून आणलेला दहशतवादी हल्ला होता असा आरोप शेख हसीना यांनी केला होता. आपल्याला सत्तेवरून हटवण्यासाठीच हा हल्ला करण्यात आला असे त्यांनी म्हटले होते. हिंसक विद्यार्थी आंदोलनानंतर शेख हसीना गेल्या वर्षी ५ ऑगस्ट रोजी भारतात पळून आल्या. तेव्हापासून त्या भारतात राहात आहेत. बांगलादेशमधील न्यायालयाने त्यांना फरारी घोषित केले आहे. आपल्याविरोधातील हा निकाल पक्षपाती व राजकीयदृष्ट्या प्रेरित आहे असे म्हणत शेख हसीना यांनी आरोप फेटाळले आहेत. तर, बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्याविरोधात लवादाने दिलेल्या निर्णयाची आम्ही नोंद घेतली आहे अशी प्रतिक्रिया भारताने नोंदवली आहे. शेजारील देशातील शांतता, लोकशाही आणि स्थिरता लक्षात घेऊन सर्व संबंधितांशी परिणामकारक संवाद साधला जाईल असे भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे. मृत्यूदंडाची शिक्षा हा अंतरिम सरकारचा अवामी लीगला राजकीय शक्ती म्हणून अवैध ठरवण्याचा एक मार्ग आहे असेही शेख हसीना यांनी म्हटले आहे. अवामी लीग हा हसीना यांचा पक्ष आहे. अंतरिम सरकारने हे आरोप हेगमधील आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालयासमोर आणावेत असे आव्हानही त्यांनी दिले आहे. अमेरिकेच्या दबावापुढे आपण मान तुकवली असती तर त्यांनी मला सत्तेवरून दूर केले नसते असे गंभीर आरोप हसीना यांनी केले आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या मानवहक्क कार्यालयानुसार नि:शस्त्र जमावाचे आंदोलन पांगवण्यासाठी बळाचा वापर करण्याचे आदेश हसीना यांनी दिले. प्रक्षोभक वक्तव्ये केली. त्यांच्यामुळे ढाका आणि आसपासच्या क्षेत्रात अनेक विद्यार्थी मृत्यूमुखी पडले. भारताच्या दृष्टिकोनातून पहायचे झाल्यास, हसीना यांच्या पंतप्रधान पदीच्या कार्यकाळात भारत-बांगलादेश संबंध स्थैर्याची हमी देत होते. परंतु आताच्या युनूस यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या भारतविरोधी भूमिकेमुळे भारतासाठी सीमाभागात आव्हानात्मक परिस्थिती निर्माण झाली आहे. आज बांगलादेशात धार्मिक कट्टरता वाढीस लागली असून अल्पसंख्याकांवरील हल्ले नित्याचे झालेले दिसतात. बांगलादेशातील या अस्थिरतेमागे अमेरिकेचा हात असल्याचे हसीना यांचे म्हणणे आहे. अमेरिका बांगलादेशला आपल्या प्रभावाखालील देश बनवू इच्छिते. आपल्या कार्यकाळात हे साध्य न झाल्याने आपला अडथळा दूर करण्यात आला असे त्यांचे म्हणणे आहे. अमेरिकेने मात्र हे आरोप हास्यास्पद आणि खोटे असल्याचे म्हटले होते.**

# मुलांना हवे मानसिक स्वातंत्र्य!

महिला व बालविकास विभाग आणि युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने बालकांच्या मानसिक, शारीरिक आणि कौटुंबिक आरोग्याची काळजी घेण्यासाठी राज्यातील अंगणवाड्यांमध्ये पालक मेळावा आयोजित करण्यात येतो. याचा सकारात्मक परिणाम होताना दिसतो. आरंभ या कार्यक्रमाच्या तीन मुख्य व्यासपीठांपैकी एक म्हणजे पालक मेळावा. घरभेटी आणि मातामंडळ बैठकांबरोबरच पालक मेळाव्याचा उद्देश म्हणजे संपूर्ण समुदायाने एकत्र शिकणे आणि मुलांच्या संगोपनाबद्दल आई बरोबर वडील आणि कुटुंबातील सदस्यांनी जागरूक होणे आवश्यक आहे.

महिला व बालविकास विभागामार्फत महिला व बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध योजना राबवल्या जातात. याप्रमाणे युनिसेफ ही संयुक्त राष्ट्रसंघाची एक संस्था आहे जी मुले आणि मातांची कल्याणासाठी काम करते. तिचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे, जगभरातील मुलांना अन्न, आरोग्य सेवा, शिक्षण आणि संरक्षण उपलब्ध करून देणे, आपत्ती, युद्ध किंवा दारिद्र्यग्रस्त भागातील मुलांना मदत करणे, लसीकरण, स्वच्छ पाणी आणि शिक्षणाच्या कार्यक्रमांद्वारे मुलांचे जीवन सुधारणे यासाठी १९४६ साली दुसऱ्या महायुद्धानंतर युद्धग्रस्त देशांतील मुलांना मदत करण्यासाठी ही संस्था स्थापन करण्यात आली.

लहान मुलांना खेळ, संवाद आणि सुरक्षित वातावरणापासून ते त्यांच्या आहारापर्यंत माहिती सांगणारे स्टॉल्स, खेळणी, शारीरिक, बौद्धिक, भावनिक आणि सामाजिक विकासासाठी आवश्यक असलेल्या गोष्टींबद्दल माहिती देण्याचे काम अंगणवाडी कर्मचारी, आरोग्य, आशा ताई करत आहेत. प्रत्येक बालकाच्या उत्तम वाढीसाठी पहिले हजार दिवस सुवर्णमयी असतात. त्यात पालक, घरातील सदस्याचा सहभाग अत्यावश्यक असतो. त्यामुळे पालकांशी मनमोकळा संवाद साधण्यासाठी महिला व बालविकास विभाग युनिसेफच्या समन्वयाने आईबरोबर वडिलांनीही बालकाला सांभाळण्याची जबाबदारी घ्यावी याचबरोबर घरातील सदस्यांचीही तेवढीच जबाबदारी असल्याचे प्रबोधन या पालक मेळाव्याच्या माध्यमातून करण्यात येते.

पालक मेळाव्याच्या माध्यमातून हे समजले की मुलांना कायम नकारात्मक प्रतिक्रिया देऊन त्यांच्या वाढीवर परिणाम होतो. त्यांना त्यांच्या पद्धतीने गोष्टी करू दिल्या तर त्यांची बौद्धिक वाढ उत्तम होते. अशी प्रतिक्रिया अंगणवाडीमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्याच्या पालकाने दिली.

अंगणवाड्यांचे समूह एकत्रित करून त्यांच्या पालकांना मेळाव्याच्या माध्यमातून एकत्र करण्यात येते. या मेळाव्याच्या माध्यमातून मुलांच्या विकासात सुधारणा, कुटुंब आणि समुदाय सशक्त करणे, बाल संगोपनाबद्दल समुदाय जागरूकता वाढवणे, अंगणवाडी आणि आशा ताईंची भूमिका अधिक बळकट करणे, समग्र बालकांच्या काळजीबाबत दृष्टीकोन तयार करणे, समुदायाचा सहभाग आणि आत्मविश्वास वाढविणे, सातत्याने टिकणाऱ्या बालकांच्या पद्धतींचा प्रसार करण्याचे काम करण्यात येते.

या मेळाव्यात दोन वर्षे वयोगटापर्यंत मुलांसाठी वयोगटानुसार खेळणी आणि शैक्षणिक साहित्य दाखवले जाते, दोऱ्यांचे जुने पुंजके, साबणाचे बॉक्स, कागदी डबे या वापरलेल्या वस्तूंपासून तयार केलेल्या खेळांच्या माध्यमातून मुलांच्या पाचही इंद्रियांचा विकास करणे हा उद्देश होय. दोऱ्यांचे वापरलेले रिळ, टाकून दिलेली झाकणे, पुठ्ठा, बांगड्या, साबणाचे रिकामे कागदी डब्बे यापासून बनवलेली तोरणं, माळा, रंगीत खेळणी मुलांना मेळाव्यात खिळवून ठेवतात. खेळणाऱ्या मुलांबरोबर त्यांची आई आणि इतर पालकांचाही समावेश होतो. काही खेळ हे पालकांसाठी असतात.

या मेळाव्याच्या माध्यमातून बालकांशी संवाद साधण्यासाठी विविध उपक्रम राबविले जातात. मुलांना विविध मुखवटे व टोपी घालून त्यांना आरशासमोर उभे केले जाते. जेणेकरून त्यांना स्वत:चा चेहरा पाहता येतो. अशा विविध उपक्रमाच्या माध्यमातून संवाद वाढवणे, मेंदूचा विकास, सामाजिक आणि भावनिक वाढ होण्यास मदत होते. याचबरोबर ब्रेन वायरिंग खेळाच्या माध्यमातून खेळ अनुभव आणि संवेदनाच्या आधारे मेंदूच्या न्यूरल कनेक्शनच्या निर्मितीचे महत्त्व समजावतो. मुलाचा मेंदू पहिल्या १००० दिवसात सर्वाधिक वाढते म्हणून या काळात स्पर्श, संवाद आणि खेळ यावर भर दिला जातो. पालक मेळाव्यात मुलांसाठी बाहूली घर तयार केले जाते. यामध्ये कल्पनाशक्तीचा वापर करून खेळ खेळवले जातात. यामुळे त्यांच्या सामाजिक, भावनिक आणि बौद्धिक विकासाला चालना मिळते. पौष्टिक पोषण अंतर्गत सहा महिन्यांपर्यंत आणि त्यानंतरचे अन्न कसे असावे हे दाखवले जाते. तसेच जंक फुडचे दुष्परिणाम आणि स्थानिक फळभाज्यांचा उपयोग सांगितला जातो.

पालक हेच मुलांचे पहिले शिक्षक असतात, तीन वर्षांच्या वयातील विकास हा आयुष्यभरासाठीचा पाया घालतो. मुलांशी संवाद, प्रेम आणि संधी दिल्यास त्यांचा मेंदू, लक्ष आणि स्मरणशक्ती जलद वाढते. प्रोत्साहन हेच सर्वांत मोठे शिक्षण आहे.

**-श्रद्धा मेश्राम, विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय**

## झाशीची राणी लक्ष्मीबाई



भारतीय वसुंधरेला अभिमान वाटणारी झाशीची राणी वीरांगना लक्ष्मीबाई खऱ्या अर्थाने एक आदर्श नायिका होती. त्यांचा जन्म १९ नोव्हेंबर १८३५ रोजी काशी येथे झाला. त्यांचे वडील मोरोपंत तांबे हे चिकनाजी आप्पांचे आश्रित होते. त्यांच्या आईचे नाव भागीरथीबाई होते. महाराणींचे आजोबा बळवंत राव हे बाजीराव पेशव्यांच्या सैन्यात सेनापती असल्यामुळे मोरोपंतांनाही पेशव्यांनी आशीर्वाद दिला होता. लक्ष्मीबाईंना बालपणी मनुबाई या नावाने ओळखले जायचे.

येथे १८३८मध्ये गंगाधर राव यांना झाशीचा राजा घोषित करण्यात आले. ते विधुर होते. १८५०मध्ये त्यांचा विवाह मनुबाईंशी झाला. १८५१मध्ये त्यांना रत्न नावाचा मुलगा झाला. झाशीच्या कानाकोपऱ्यात आनंदाची लाट पसरली, पण चार महिन्यांनी तो मुलगा गेला.संपूर्ण झाशी दु:खाच्या सागरात बुडाली. राजा गंगाधर राव यांना इतका मोठा धक्का बसला की, ते सावरले नाहीत आणि २१ नोव्हेंबर १८५३ रोजी त्यांचे निधन झाले.राजे गंगाधर राव यांनी त्यांच्या हयातीतच त्यांच्या कुटुंबातील मुलगा दामोदर राव यांना दत्तक पुत्र मानून इंग्रज सरकारला माहिती दिली होती, पण ईस्ट इंडिया कंपनीच्या सरकारने दत्तक पुत्र नाकारला.

२७ फेब्रुवारी १८५४ रोजी लॉर्ड डलहौसीने दामोदररावांच्या दत्तक पुत्राला दत्तक घेण्याच्या धोरणाखाली नकार दिला आणि झाशीचे ब्रिटीश राज्यात एकीकरण करण्याची घोषणा केली. पोलिटिकल एजंटची माहिती मिळताच राणींच्या तोंडून 'मी माझी झाशी देणार नाही' हे वाक्य बाहेर पडले. ७ मार्च १८५४ रोजी झाशी इंग्रजांच्या ताब्यात गेली. राणीने पेन्शन नाकारली व नगरच्या राजवाड्यात राहू लागली.

येथूनच भारताच्या पहिल्या स्वातंत्र्य क्रांतीचे बीज अंकुरले. उत्तर भारतातील नवाब व राजे व सम्राट इंग्रजांच्या राज्य लिपसाच्या धोरणावर असंतुष्ट झाले आणि सर्वांमध्ये बंडाची आग पेटली. राणी लक्ष्मीबाईंनी ही सुवर्णसंधी मानून क्रांतीची ज्योत अधिक प्रज्वलित करून इंग्रजांविरुद्ध उठाव करण्याची योजना आखली.

पूर्ण देशात क्रांतीची संघटित आणि ठामपणे अंमलबजावणी करण्याची तारीख ३१ मे १८५७ निश्चित करण्यात आली होती, पण त्याआधीच क्रांतीची ज्योत पेटली २३ मार्च १८५८ रोजी झाशीची ऐतिहासिक लढाई सुरू झाली.

कमांडर सर ह्यू रोजने आपल्या सैन्यासह राणींचा सर्व शक्तीनिशी पाठलाग केला भयंकर युद्धानंतर ग्वाल्हेरचा किल्ला जिंकला. ग्वाल्हेरची शेवटची लढाई १८ जून १८५८ रोजी झाली. राणी लक्ष्मीबाईंनी स्वातंत्र्ययुद्धात आयुष्याचे शेवटचे बलिदान देऊन जनतेला चैतन्य दिले आणि स्वातंत्र्यासाठी बलिदानाचा संदेश दिला. (साभार : इंटरनेट)




## फास्ट चार्जिंगमुळे होऊ शकते तुमच्या फोनचे नुकसान?



आधी स्मार्टफोन म्हटलं की, कॅमेरा, साऊंड क्वॉलिटी बघितली जात होती, पण आता इतरही अनेक फीचर्स मोबाइल विकत घेताना पाहिले जातात. त्यातील एक म्हणजे स्मार्टफोनची बॅटरी. अल्ट्रा-फास्ट चार्जर नेहमीपेक्षा अधिक वेगाने स्मार्टफोन चार्ज करण्याच्या क्षमतेमुळे लोकप्रिय होत आहेत, पण हे चार्जर नियमितपणे वापरताना अधिक सावध असले पाहिजे.

* हिट बिल्डअप : अल्ट्रा-फास्ट चार्जिंगमधील प्राथमिक समस्यांपैकी एक म्हणजे तुमच्या स्मार्टफोनमध्ये जास्त उष्णता निर्माण होऊ लागते. जलद चार्जिंगमुळे बॅटरीमध्ये अगदी कमी वेळात भरपूर पॉवर जाते, ज्यामुळे डिव्हाइस जास्त गरम होते आणि जे काही वेळेस धोकादायकसुद्धा ठरू शकते.

उष्णतेमुळे तुमच्या स्मार्टफोनवर थर्मल ताण येऊ शकतो, यामुळे अंतर्गत घटकांचे नुकसान होऊ शकते, बॅटरीचे आयुष्य कमी होऊ शकते, मोबाइल वापरादरम्यान तो जास्त गरम होऊ शकतो आणि काही वेळा स्फोटसुद्धा होऊ शकतो.

* बॅटरी डिग्रेडेशन : तुमचा फोन अल्ट्रा-फास्ट चार्ज करणे हे त्यांच्यासाठी उपयुक्त आहे, जे मुख्यतः दिवसभर कामासाठी बाहेर असतात. मोबाइल जलद चार्ज करणे वेळ वाचवत असेल, तरीही यामुळे बॅटरीचे आयुष्यदेखील कमी होते. तुमच्या स्मार्टफोनमध्ये लिथियम-आयन बॅटरी असल्यास, फास्ट चार्जिंगमुळे स्मार्टफोन लवकर खराब होईल.

* कॉम्पॅटिबिलिटी समस्या : सर्व स्मार्टफोन्स अल्ट्रा-फास्ट चार्जिंग हाताळण्यासाठी डिझाइन करण्यात आलेले नाहीत, त्यामुळे जर जास्त पावरफुल चार्जर तुमच्या फोनसाठी वापरत असाल तर तो स्मार्टफोनला हाताळण्यासाठी कठीण जाऊ शकते. परिणामी कॉम्पॅटिबिलिटी समस्या, फोन जास्त गरम होणे किंवा अगदी चार्ज होत नाही अशा समस्या उद्भवू शकतात.

* वीजबिल वाढीचा धोका : अल्ट्रा-फास्ट चार्जर्समुळे वीजबिलात वाढ होण्याचा धोका असतो, ज्यामुळे स्मार्टफोनमधील संवेदनशील (सेन्सिटिव्ह) घटकांना नुकसान होऊ शकते म्हणजेच चार्जिंग पोर्ट किंवा बॅटरी. अनेक चार्जरमध्ये सुरक्षिततेची सुविधा असते, तरीही विजेच्या समस्या निर्माण होऊ शकतात, जेव्हा चार्जिंगचे वातावरण अस्थिर असते.

* रिड्यूस बॅटरी लाईफस्पॅन : आता लाँच करण्यात आलेले नवीन स्मार्टफोन जुन्या मॉडेल्सपेक्षा जलद चार्जिंगला अधिक चांगल्या प्रकारे हाताळण्यासाठी डिझाइन केलेले आहेत.

# लघुकथेचे प्रवर्तक, विनोदी लेखक कॅ. लिमये



## निमित्त

मराठी कथाकार आणि विनोदकार अशी कॅ. गोपाळ गंगाधर लिमये यांची ओळख राहिलेली आहे. त्यांचा आज स्मृतिदिन. लिमये यांचा जन्म २५ सप्टेंबर १८८१ रोजी पुणे येथे झाला. तथापि त्यांच्या वडिलांची बदली बेळगावला झाल्यामुळे त्यांचे बालपण तेथे गेले. त्यांचे प्राथमिक शिक्षण बेळगावलाच झाले. माध्यमिक शिक्षण त्यांनी पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमधून घेतले. पुढे मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजातून वैद्यकीय पदवी घेतली. वैद्यकीय परीक्षेत त्यांना सुवर्णपदक मिळाले. 'इंडियन मेडिकल सर्व्हिस'साठी त्यांची निवड होऊन १९१८ते १९२१ ह्या कालखंडात त्यांना सैन्यात कॅप्टन या हुद्यावर नेमले गेले. १९२२ ते १९५४ पर्यंत मुंबई महानगरपालिकेत आरोग्याधिकारी म्हणूनच त्यांनी काम पाहिले.


लिमये यांनी १९१२पासून लेखनाला सुरुवात केली. 'प्रेमाचा खेळ' ही त्यांची पहिली कथा १९१२मध्ये मासिक मनोरंजनात प्रसिद्ध झाली. त्याच सुमारास बापूची प्रतिज्ञा ही त्यांची विनोदी दीर्घकथा पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाली. सखा सोनचाफा व इतर गोष्टी (१९२२), वनज्योत्स्ना (दीर्घकथा, १९२४), शकूचा भाऊ (१९२८), तिच्याकरिता (१९३३) आणि हेलकावे (१९३८) हे त्यांचे अन्य कथाग्रंथ. यांखेरीज त्यांच्या काही कथांचा एक संग्रह-गो.ग. लिमये यांच्या निवडक कथा -१९७० साली राम कोलारकर यांनी संपादून प्रसिद्ध केला. १९२०च्या पूर्वीची त्यांची कथा घटनाप्रधान, बोधप्रधान आणि काहीशी पाल्हाळिक होती, परंतु १९२२ साली त्यांनी लिहिलेली 'किस्मत' ही कथा मराठी कथेला वेगळी वाट दाखवणारी ठरली. या कथेत त्यांनी माणसाच्या मनाचा वेध घेतला. घटनाप्रधान आणि कल्पनारम्य वातावरणातून मराठी कथेला वास्तवतेकडे वळविण्याचा, अंतर्मुख करण्याचा प्रयत्न केला. ह्याशिवाय युद्धाच्या अनुभवांवर कथा लिहून मराठीत युद्धकथांची लक्षणीय भर घातली.

कथेइतकेच मोलाचे कार्य लिमये यांनी विनोदाच्या क्षेत्रात केले. विनोदी लेखसंग्रह, विनोदसागर, जुना बाजार, गोपाळकाला, तुमच्याकरिता व विनोदबकावली हे त्यांच्या विनोदी लेखांचे संग्रह. त्यांच्या आरंभीच्या विनोदावर कोल्हटकर व गडकरी यांची छाप दिसते. मानवी स्वभावाच्या सूक्ष्म अवलोकनातून त्यांचा विनोद निर्माण झालेला आहे. मानवी जीवनातील विसंगतींचे दर्शन तो घडवतो पण कुठेही बोचक उपरोध नसल्यामुळे तो प्रसन्न वाटतो.

साध्या साध्या घटनांतून विनोदनिर्मिती करण्याचे त्यांचे कौशल्य 'छकडा, सिंहगड आणि कुत्रे', 'आमची (आळंदीची) सायकल ट्रिप,' 'पाण्याच्या बादलीचा विलक्षण खटला' यांसारख्या विनोदी लेखांतून सहज दिसून येते. कथा, नाट्य, प्रवासवर्णन, आत्मनिवेदन अशा अनेक माध्यमांचा विनोदासाठी त्यांनी मोठ्या कुशलतेने उपयोग करून घेतला. त्यामुळे त्यांच्या विनोदी लेखनात लक्षणीय विविधता आलेली आहे. सैन्यांतील आठवणी (१९३९) हे लिमये यांचे आत्मनिवेदनात्मक पुस्तक लिहिले आहे. पुणे येथे १८ नोव्हेंबर १९७१ रोजी ते निधन पावले.

**-म.ना. अदवंत (मराठी विश्वकोष)**

## चित्र रंगवा





## आरोग्य प्रहर

### 'या' १२ केकच्या सेवनाने होऊ शकतो कॅन्सर

चॉकलेट केक, पाईनापल केक, ब्लू बेरी, रेड वेल्वेट केक, ब्लॅक फॉरेस्ट केक अशा विविध केकची नावे ऐकून तुमच्याही तोंडाला पाणी सुटलं असेल. अनेकांना केक खायला प्रचंड आवडतो. कोणाचा वाढदिवस असू द्या किंवा एखादं चांगलं काम जरी झालं तरी आजकाल केक कापून तो साजरा करण्याचा ट्रेंड आहे, पण तुम्हाला माहीत आहे का? केक खाल्ल्याने कॅन्सरसारखे गंभीर आजार होऊ शकतात. अलीकडेच कर्नाटक अन्न सुरक्षा आणि गुणवत्ता विभागाच्या अलीकडील अभ्यासात रेड वेल्वेट आणि ब्लॅक फॉरेस्टसारख्या केकच्या चाचणीमध्ये २३५पैकी १२ केक नमुन्यांमध्ये कर्करोगजन्य घटक आढळून आले आहेत. अन्न सुरक्षा आयुक्त श्रीनिवास के यांनी राज्यभरातील बेकरींना ते वापरत असलेल्या घटकांबद्दल अधिक सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. विशेषत: हानिकारक रसायने आणि कृत्रिम रंगाच्या वापराविरुद्ध इशारा दिला आहे.



कर्नाटक सरकारचे म्हणणे आहे की, एकूण २३५ केक नमुन्यांपैकी २२३ सुरक्षित आढळले आहेत, परंतु १२ केकमध्ये धोकादायक पातळीवर कृत्रिम रंग असल्याचे आढळले आहे. त्यामुळे कॅन्सरसारख्या आजारांचा धोका असतो. कर्नाटकच्या अन्न सुरक्षा विभागाच्या म्हणण्यानुसार रेड वेल्वेट आणि ब्लॅक फॉरेस्ट केक, जे लोक मोठ्या उत्साहाने खातात ते तुमच्या आरोग्यासाठी हानिकारक असू शकतात.

अन्न सुरक्षा आयुक्त श्रीनिवास यांनी सांगितले की, विविध बेकरीमधील नमुन्यांवर केलेल्या चाचण्यांमध्ये केकच्या विशिष्ट प्रकारांमध्ये कृत्रिम रंग जास्त प्रमाणात आढळून आले. गोबी मंचुरियन, कबाब आणि पाणीपुरी सॉस यांसारख्या पदार्थांमधील कृत्रिम रंगांवर विभागाच्या मागील बंदीनंतर आता केकसाठी हा इशारा देण्यात आला आहे.

डॉ. मनीषा अरोरा यांनी या संदर्भात सविस्तर माहिती देत संबंधित संभाव्य आरोग्य धोके स्पष्ट केले आहेत. कृत्रिम रंग मर्यादेपेक्षा जास्त प्रमाणात वापरल्यास नुकसान होऊ शकते. हेच रंग कर्करोगाचा धोका वाढवू शकतात आणि हार्मोनल व्यत्यय, रोगप्रतिकारक शक्ती कमजोर करण्यासारख्या इतर आरोग्य समस्यांना कारणीभूत ठरू शकतात. केकचे अधूनमधून सेवन केल्याने कमीत कमी धोका निर्माण होऊ शकतो, मात्र, नियमित सेवन केल्याने दीर्घकालीन आरोग्यावर लक्षणीय परिणाम होऊ शकतात. विशेषत: लहान मुलांवर, ज्यांचे विकसनशील शरीर विषारी द्रव्यांसाठी अधिक संवेदनशील असते.

# मुरुडमध्ये १३ उमेदवारी अर्ज छाननीत झाले बाद



**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड जंजिरा नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूकी करिता ५ नगराध्यक्षा, तर ७४ नगरसेवक पदासाठी करिता अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार-आदेश डफल यांच्या कडे सुपुर्त करण्यात आले होते.आज सकाळी ११ वाजता नगरपरिषद कार्यालयातील सभागृहात निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार-आदेश डफल यांनी प्रथम ५ नगराध्यक्षाच्या अर्जाची छाननी केली असता यामध्ये शिवसेना पक्षांकडून स्नेहा किशोर पाटील याचं उमेदवारी अर्ज अपात्र ठरविण्यात आले.

यानंतर प्रभाग १ ते १० मधील उमेदवारी अर्जाची छाननी केली असता ७४ पैकी १२ अर्ज बाद झाले यामध्ये प्रभाग क्रमांक १ अ मधुन शिवसेना उमेदवार राधा पाटील ब मधुन शिवसेना पक्षांकडून हर्षल दांडेकरव व शिवसेनचे उमेदवार मंदार दांडेकर शेकाप पक्षांचे उमेदवार सिध्देश सुर्ते प्रभाग क्रमांक ४ ब मधुन शिवसेनचे उमेदवार शाहिस्ता शेख प्रभाग क्रमांक ५ ब मधुन शिवसेनेचे उमर कबले प्रभाग क्रमांक ६ ब मधुन शिवसेनेचे अविनाश दांडेकर प्रभाग क्रमांक ९ अ मधुन शिवसेनेचे कृष्णा आरेकर प्रभाग क्रमांक १० अ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रांजली मकुप्रभाग क्रमांक ८ ब मधुन शिवसेना पक्षांचे उमेदवार रुपेश पाटील, ओम पाटील ,प्रभाग क्रमांक ३ब मधुन अपक्ष उमेदवार नरेंद्र माने यांचे उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी आदेश डफल यांनी अपात्र ठरविण्यात आले आहेत.

राज्य निवडणूक आयोग यांच्या सूचनेप्रमाणे नोंदणीकृत राजकीय पक्षाच्यावतीने नामनिर्देशन अर्ज सादर केलेल्या डमी उमेदवाराच्या नामनिर्देशन अर्जात एकच सूचक असल्यास छाननी अंती असा डमी अर्ज बाद करावा.या सूचनेप्रमाणे हे अर्ज बाद झाले आहेत. तर नगराध्यक्षा पदाकरीता ४ उमेदवार तर नगरसेवकासाठी ६२ उमेदवारी अर्ज वैध ठरविण्यात आले. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी आदेश डफल आदिंसह पक्षांचे उमेदवार व पदाधिकारी उपस्थित होते.

## माजी नगरसेवक चंद्रकांत भगत यांचा राष्ट्रवादी काँग्रेसचा राजीनामा

**श्रीवर्धन :** भैरवनाथ पाखाडी येथील माजी नगरसेवक श्री. चंद्रकांत महादेव भगत यांनी राष्ट्रवादी अजित पवार काँग्रेस पक्षाचे सदस्यत्व सोडण्याचा निर्णय घेतला आहे. प्रदेशाध्यक्षांना पाठवलेल्या पत्रातून त्यांनी पक्षातील दीर्घकाळ जबाबदारी न मिळणे व कार्यकर्त्यांशी संवादाचा अभाव याचा उल्लेख केला. सन २०१२ पासून राष्ट्रवादीत सक्रिय असलेल्या भगत यांनी २०१७ पर्यंत नगरसेवक म्हणून सेवा दिली. मात्र, २०१८ नंतर कोणतीही पक्षीय जबाबदारी न मिळाल्याने आणि सदस्यत्व निरुपयोगी ठरत असल्याने त्यांनी आज राजीनामा अध्यक्षांकडेही पाठवल्याचे सांगितले


### जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीशीने असे कळविणेत येत आहे की, मौजे मोर्बे ता.-पनवेल, जि-रायगड येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तीच्या मालकी हक्काची, मिळकत या जमीन ही आगचे आशिलांगी कायमस्वरूपी विकण्याचे हरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहोत, सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे:

**- मिळकतीचे वर्णन**

**मौजेः मोर्बे, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड**

| गाव | भोगवटादारांचे नाव | गट क्रमांक उपविभाग | क्षेत्र हे आर.पॉ. | आकारी स.पै. |
|---|---|---|---|---|
| मौजे-मोर्बे ता. पनवेल | १. योगेश बाळकृष्ण भगत<br>२ राजेश बाळकृष्ण भगत<br>३. रुपेश बाळकृष्ण भगत<br>४. योगिता बाळकृष्ण भगत<br>५. कुंदा बालकृष्ण भगत<br>सर्व रा मोर्बे, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड | १०२/११ | ०.३८,००<br>०.०७.००<br>०.४५.०० | ०.७५ |

सदरहू जागा, जामिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या न येणा-या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण: पनवेल**
**दिनांकः १८/११/२०२५**

**सही/-**
**अॅड. चित्तरंजन सुधाकर लाड**
**पत्ता-०३, श्री हरेकृष्णा को. ऑ. सोसायटी, प्लॉट नं. १२, सेक्टर ०५, नविन पनवेल ता. पनवेल जि. रायगड ४१०२०६**
**मो. क्र. ९६९९४९९९६३**



### जाहिर सुचना

इमारतींचे पुनर्विकासाठी PMC (Proj. Man.Cons.) कडून स्वारस्य व्यक्त करणे. PL5 अपार्टमेंट ओनर्स असोसीएशन बिल्डींग क्र. २६ ते ३२ सेक्टर १७, नवीन पनवेल कोंडोनियम नं.७ प्लॉट क्षेत्रफळ ३३१८ ची. मि. सदनिका ८४ अशा इमारतींचे पुनर्विकासाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या Project Management counsultant कडून स्वास्थ व्यक्ती/संस्था यांच्या कडून पुनर्विकास कामासाठी संपूर्ण माहिती असलेले PMC महणून नेमणूक करायचे आहे. सदर PMC यांची प्रोफाईल आणि संस्थात्मक तपशील आणि कार्यक्षेत्रासह आम्हाला पाठवू शकतात.

सदर PL5 अपार्टमेंट ओनर्स असोसीएशनचे रूपांतरण गृहनिर्माण सोसायटी मध्ये करण्याचा खर्च पूर्ण पणे PMC ने करायचा आहे. सदर पत्र व्यवहार हा आमच्या असोसिएनचे खजिनदार श्री सिद्धार्थ शंकर खरात बिल्डींग नं. २९, सदनिका क्र. १, सेक्टर नं १७, सिडको कॉलनी, नवीन पनवेल ४१०२०६ येथे दि. ३० नोव्हेंबर २०२५ रोजी सांयकाळी ५ वाजे पर्यंत देऊ शकतात.

सदर PMC प्रोजेक्टस मॅनेजमेंट कन्सल्टन्सीने प्रोफाईल सोबत रू.१०,०००/- (दहा हजार) ही अनामत रक्कम DD स्वरूपात जमा करणे आवश्यक आहे.

टिप : विकासक (डेव्हलर्पर) नेमण्याचा अधिकार असोसिएशनचा /सोसायटीचा राहिल याची कृपया नोंद घ्यावी.

**ठिकाण :- पनवेल**
**दिनांक :- १८/११/२०२५**

**सही/-**
**अध्यक्ष**
P. L. 5 Apartment Owner's Association
Reg. No.P/ 238, dt. 20/5/1986
Sector No. 17, Bldg. No. 26 to 32, New Panvel-410206, Dist. Raigad, Navi Mumbai.



## पनवेल महानगरपालिका
**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

**परिशिष्ट -१०**
**(प्रभागनिहाय प्रारुप आरक्षण प्रसिध्दी, नमुना मराठी)**
**पनवेल महानगरपालिका**

पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२५ करिता दि. ११/११/२०२५ रोजी व दि.१७/११/२०२५ रोजी पनवेल महानगरपालिकेच्या आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात प्रारुप आरक्षण सोडत घेऊन प्रभाग निहाय राखून ठेवायच्या अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागसप्रवर्ग या साठी सोडतीने व सर्वसवाधारण जागांकरिता नेमूण देण्याच्या जागा निश्चित केल्या आहेत. व त्यास मा. राज्य निवडणूक आयोगाकडील पत्र क्र. रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.५७/का-५ दि.१८/११/२०२५ ने मान्यता मिळाली आहे.

त्यानुसार पनवेल महानगरपालिकेच्या २०२५ च्या सार्वत्रिक निवडणूकीकरीता अंतिम प्रभाग रचनेमधील प्रत्येक प्रभागातील जागानिहाय आरक्षण खालील प्रमाणे राहील.

**एकूण जागांचा तपशील**

| अ.क्र. | प्रवर्ग | एकूण जागांची संख्या | पैकी त्या प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित जागांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | ६ | ३ |
| २ | अनुसूचित जमाती | २ | १ |
| ३ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | २१ | ११ |
| ४ | सर्वसाधारण | ४९ | २४ |
| | एकूण | ७८ | ३९ |

**प्रभागातील जागानिहाय आरक्षणाचा तपशील**

| अ.क्र. | प्रभाग क्रमांक | जागा क्र. | आरक्षण |
|---|---|---|---|
| १ | १ | १-अ | ना.मा.प्र. (महिला) |
| २ | | १-ब | सर्वसाधारण (महिला) |
| ३ | | १-क | सर्वसाधारण |
| ४ | | १-ड | सर्वसाधारण |
| ५ | २ | २-अ | ना.मा.प्र. (महिला) |
| ६ | | २-ब | सर्वसाधारण (महिला) |
| ७ | | २-क | सर्वसाधारण |
| ८ | | २-ड | सर्वसाधारण |
| ९ | ३ | ३-अ | अनुसूचित जमाती (महिला) |
| १० | | ३-ब | ना.मा.प्र. (महिला) |
| ११ | | ३-क | सर्वसाधारण |
| १२ | | ३-ड | सर्वसाधारण |
| १३ | ४ | ४-अ | ना.मा.प्र. |
| १४ | | ४-ब | सर्वसाधारण (महिला) |
| १५ | | ४-क | सर्वसाधारण (महिला) |
| १६ | | ४-ड | सर्वसाधारण |
| १७ | ५ | ५-अ | ना.मा.प्र. |
| १८ | | ५-ब | सर्वसाधारण (महिला) |
| १९ | | ५-क | सर्वसाधारण (महिला) |
| २० | | ५-ड | सर्वसाधारण |
| २१ | ६ | ६-अ | अनुसूचित जाती (महिला) |
| २२ | | ६-ब | ना.मा.प्र. |
| २३ | | ६-क | सर्वसाधारण (महिला) |
| २४ | | ६-ड | सर्वसाधारण |
| २५ | ७ | ७-अ | ना.मा.प्र. |
| २६ | | ७-ब | सर्वसाधारण (महिला) |
| २७ | | ७-क | सर्वसाधारण (महिला) |
| २८ | | ७-ड | सर्वसाधारण |
| २९ | ८ | ८-अ | ना.मा.प्र. |
| ३० | | ८-ब | सर्वसाधारण (महिला) |
| ३१ | | ८-क | सर्वसाधारण (महिला) |
| ३२ | | ८-ड | सर्वसाधारण |
| ३३ | ९ | ९-अ | अनुसूचित जमाती |
| ३४ | | ९-ब | ना.मा.प्र. (महिला) |
| ३५ | | ९-क | सर्वसाधारण (महिला) |
| ३६ | | ९-ड | सर्वसाधारण |
| ३७ | १० | १०-अ | ना.मा.प्र. |
| ३८ | | १०-ब | सर्वसाधारण (महिला) |
| ३९ | | १०-क | सर्वसाधारण (महिला) |
| ४० | | १०-ड | सर्वसाधारण |
| ४१ | ११ | ११-अ | अनुसूचित जाती (महिला) |
| ४२ | | ११-ब | ना.मा.प्र. |
| ४३ | | ११-क | सर्वसाधारण |
| ४४ | १२ | १२-अ | अनुसूचित जाती |
| ४५ | | १२-ब | ना.मा.प्र. (महिला) |
| ४६ | | १२-क | सर्वसाधारण (महिला) |
| ४७ | | १२-ड | सर्वसाधारण |
| ४८ | १३ | १३-अ | अनुसूचित जाती (महिला) |
| ४९ | | १३-ब | ना.मा.प्र. (महिला) |
| ५० | | १३-क | सर्वसाधारण |
| ५१ | | १३-ड | सर्वसाधारण |
| ५२ | १४ | १४-अ | ना.मा.प्र. |
| ५३ | | १४-ब | सर्वसाधारण (महिला) |
| ५४ | | १४-क | सर्वसाधारण (महिला) |
| ५५ | | १४-ड | सर्वसाधारण |
| ५६ | १५ | १५-अ | अनुसूचित जाती |
| ५७ | | १५-ब | ना.मा.प्र. (महिला) |
| ५८ | | १५-क | सर्वसाधारण (महिला) |
| ५९ | | १५-ड | सर्वसाधारण |
| ६० | १६ | १६-अ | ना.मा.प्र. (महिला) |
| ६१ | | १६-ब | सर्वसाधारण (महिला) |
| ६२ | | १६-क | सर्वसाधारण |
| ६३ | | १६-ड | सर्वसाधारण |
| ६४ | १७ | १७-अ | अनुसूचित जाती |
| ६५ | | १७-ब | ना.मा.प्र. (महिला) |
| ६६ | | १७-क | सर्वसाधारण (महिला) |
| ६७ | | १७-ड | सर्वसाधारण |
| ६८ | १८ | १८-अ | ना.मा.प्र. (महिला) |
| ६९ | | १८-ब | ना.मा.प्र. |
| ७० | | १८-क | सर्वसाधारण (महिला) |
| ७१ | | १८-ड | सर्वसाधारण |
| ७२ | १९ | १९-अ | ना.मा.प्र. (महिला) |
| ७३ | | १९-ब | सर्वसाधारण (महिला) |
| ७४ | | १९-क | सर्वसाधारण |
| ७५ | | १९-ड | सर्वसाधारण |
| ७६ | २० | २०-अ | ना.मा.प्र. |
| ७७ | | २०-ब | सर्वसाधारण (महिला) |
| ७८ | | २०-क | सर्वसाधारण (महिला) |

सदर जाहिर सूचनेत नमुद केल्यानुसार आरक्षणाबाबत काही हरकती/सूचना असल्यास त्या दिनांक १९/११/२०२५ ते दिनांक २५ नोव्हेंबर, २०२५ पर्यंत पनवेल महानगरपालिका मुख्यालय येथे तसेच प्रभाग समिती कार्यालये, प्रभाग समिती अ, ब, क, ड, व उपविभाग नावडे या ठिकाणी सादर कराव्यात.

**जा.क्र. पमपा/ जनसंपर्क./३१२५/**
**प्र.क्र.६०६/६२७/२०२५**
**दिनांक :- १८/११/२०२५**

**सही/-**
**आयक्त,**
**पनवेल महागरपालिका**



MAHAVITARAN

## TENDER NOTICE

Following Tender is invited from Eligible Bidders for Pen Circle, Raigad District. The Details are as given below-

| Tender No. | Particulars | Sale Opening, Sale Closing Dates & Bid Submission |
|---|---|---|
| SE/PC/T-04/S.Stn PM/2025-26 | **Preventive Maintenance of Substation in Pen Circle for 1 year i.e. FY 2025-26**<br>**Tender amount: Rs- 1.00 Cr.** | Sale Date;<br>Dt.19/11/2025 To Dt. 04/12/2025 up to 17.00 Hrs.<br>Bid Submission Dt.04/12/2025 upto 23:00 Hrs. |

The Tender Documents are available on MSEDCL Official Website **http://works.mahadiscom.in/eTender/etender.**

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER (PC), PEN**



## जिल्हाधिकारी रायगड यांचे कार्यालय
## हमाल पुरवठा करणे करीता निविदा सूचना

जिल्हाधिकारी कार्यालय रायगड, सामान्य शाखा
हमाल निविदा/कावि/ /२०२५
दि.१७/११/२०२५

रायगड जिल्ह्यातील होणा-या आगामी जिल्हा परिषद/पंचायत समिती/नगरपालिका/नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक-२०२५ चे कामकाजाकरीता, तसेच सदर निवडणुकांच्या पूर्व तयारीकरीता जिल्हा निवडणूक कार्यालय रायगड व जिल्हयातील सर्व तालुक्याच्या मुख्यालय ठिकाणी अथवा सक्षम प्राधिकारी आदेश देतील त्या ठिकाणी हमाल पुरवठा करणेकामी अनुभवी व योग्य अभिकर्त्याकडून विहीत नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे मागविण्यात येत आहे. सदर ई-निविदा **http://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**निविदेच्या कामाचा तपशील :-**

रायगड जिल्ह्यातील होणा-या आगामी जिल्हा परिषद/पंचायत समिती/नगरपालिका/नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक-२०२५ चे कामकाजाकरीता, तसेच सदर निवडणूकांच्या पूर्व तयारीकरीता जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हयातील सर्व तालुक्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणी अथवा सक्षम प्राधिकारी आदेश देतील त्या ठिकाणी हमाल पुरवठा करणेकामी ई-निविदा.....

**सदर निविदेची कार्यक्रम पत्रिका खालील प्रमाणे राहील :-**

| | |
|---|---|
| निविदा अदांजित रक्कम रुपये | रु.५०,००,०००/- (रु. पन्नास लाख फक्त) |
| कोऱ्या ई निविदा फार्मची किंमत रक्कम रुपये (ऑनलाईन भरणा केलेली पावती जोडावी) | रु.६,०००/- (रु. सहा हजार फक्त) (विना परतावा) |
| बयाणा EMD रक्कम रुपये (ऑनलाईन भरणा केलेली पावती जोडावी) | रू.९०,०००/- (रु. नव्वद हजार फक्त) |
| सुरक्षा अनामत रक्कम रुपये (ई-निविदा मंजूर झालेनंतर राष्ट्रीयकृत बँकेची बँक गॅरंटी) | रू.१,५०,०००/- (रु. एक लाख पन्नास हजार फक्त) |
| ई निविदा प्रसिध्दीचा दिनांक व वेळ | दि. १८/११/२०२५ सकाळी ११.०० वाजता |
| ई- निविदा भरण्याचा कालावधी | दि. १८/११/२०२५ सकाळी ११.०० वाजता पासून ते दि. २४/११/२०२५ सायंकाळी ०४.०० पर्यंत |
| निविदा पूर्व बैठक (Prebid Meeting) दिनांक वेळ | दि. १९/११/२०२५ वेळ सकाळी ठिक ११.०० वा. |
| ई-निविदा ऑनलाईन स्वीकृतीचा दिनांक व वेळ | दि. १८/११/२०२५ वेळ सकाळी ठिक ११.०० वा. ते दि. २४/११/२०२५ सायं. ४.०० वाजेपर्यंत |
| ई निविदा लिफाफा क्र. १ (निविदा तांत्रिक लिफाफा) उघडण्याचा दिनांक व वेळ | दि.२५/११/२०२५ वेळ सायं. ठिक ४.०० वा. |
| ई निविदा उघडण्याचे ठिकाण | सामान्य शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय रायगड |
| निविदा करार कालावधी | एक वर्षापर्यंत |
| ई निविदा संपर्क अधिकारी | उपजिल्हाधिकारी (सा.प्र.), जिल्हाधिकारी कार्यालय रायगड |

१. ज्या निविदाधारकांचे निविदा अर्ज **http://mahatenders.gov.in** या संकेस्थळावर निर्धारीत मुदतीत सादर केली जातील. केवळ त्याच निविदाधारकांच्या निविदा विचारात घेण्यात येतील. सदर निविदेची वैधता १२० दिवसांकरीता राहील. तसेच आवश्यकतेनुसार अतिरिक्त ६० दिवसांची मुदतवाढ देण्याचा अधिकार जिल्हाधिकारी रायगड यांना राहील.
२. प्राप्त झालेल्या निविदा कारणाशिवाय स्वीकारणे अथवा नाकारण्याचे अधिकार जिल्हाधिकारी रायगड यांनी स्वतः राखून ठेवले आहेत.
३. सदरची निविदा काम प्राप्त करुन देण्याची कोणतीही हमी देत नाही.
४. निविदेत भाग घेणा-या निविदाधारकानी डिजिटल सिग्नेचर व वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर विहीत नाव नोंदणी करून घेणे आवश्यक आहे.
५. निविदेबाबतची पूर्व बैठक वरील प्रमाणे निर्धारित दिवशी सामान्य शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड अलिबाग येथे राहील.
६. निविदाधारकांनी अथवा त्यांनी नामनिर्देशीत केलेल्या प्रतिनिधीने निविदा उघडण्याचे वेळी जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड येथे उपस्थित रहावे.
७. सदर निविदेच्या अटी व शर्ती **http://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**आरओसी २०२५-२६/क्र-५/c ४०४२**

**सही/-**
**(किशोर. ना. जावळे)**
**जिल्हाधिकारी रायगड**

# सफाई कर्मचारी आयोगाकडून नवी मुंबईचा आढावा

## अध्यक्ष शेरसिंग डागोर यांची पालिकेत बैठक

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयाला महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) शेरसिंग रुक्कानसिंग डागोर यांनी भेट देत आढावा बैठक घेतली. या प्रसंगी अतिरिक्त आयुक्त डॉ.राहुल गेठे यांनी महानगरपालिकेच्या वतीने अध्यक्षांचे स्वागत केले.



परिमंडळ २चे उपायुक्त संजय शिंदे यांनी सादरीकरणाव्दारे अध्यक्ष महोदयांना नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने स्वच्छतेसाठी करीत असलेल्या कार्यवाहीची सविस्तर माहिती दिली. नवी मुंबई महानगरपालिका स्वच्छ सर्वेक्षणामध्ये नेहमीच आघाडीवर असलेले शहर असून यावर्षी ‘स्वच्छ सर्वेक्षण २०२४’मध्ये देशातील सर्वोत्तम स्वच्छ शहरांच्या सुपर स्वच्छ लीगमध्ये नवी मुंबईचा समावेश झाला असल्याची माहिती देत यामध्ये स्वच्छताकर्मींच्या समर्पित कामाचा सिंहाचा वाटा असल्याचे त्यांनी सांगितले.

याचप्रमाणे दैनंदिन स्वच्छतेत यांत्रिकी वाहने व साहित्याचा प्रभावी वापर तसेच सफाई कर्मचाऱ्यांसाठी राबविण्यात येत असलेल्या योजना आणि लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार करण्यात आलेली कार्यवाही याबाबतही माहिती देण्यात आली. या वेळी प्रशासन विभागाचे उपायुक्त किसनराव पलांडे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी सत्यवान उबाळे, सहा.संचालक नगररचना सोमनाथ केकाण, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त डॉ.अजय गडदे आणि इतर विभागप्रमुख उपस्थित होते.

या वेळी मार्गदर्शन करताना महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग डागोर यांनी सफाई कर्मचाऱ्यांसाठी महाराष्ट्र शासनामार्फत समाजकल्याण विभागाच्या वतीने विविध लोककल्याणकारी योजना राबविण्यात येतात. त्यांचा लाभ सफाई कर्मचाऱ्यांना मिळण्यासाठी महानगरपालिकेने पुढाकार घेऊन विशेष शिबिर राबवावे अशी सूचना केली. नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

नवी मुंबई महानगरपालिकेत मोठया संख्येने सफाई कर्मचारी हे कंत्राटी पध्दतीने कार्यरत असून ते सेवानिवृत्त होताना त्यांचा यथोचित सन्मान करण्यात यावा असे सूचित करतानाच त्यांना रमाई घरकुल योजना, डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजना यांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत असेही अध्यक्ष महोदयांमार्फत सूचित करण्यात आले. सफाई कर्मचाऱ्यांच्या व त्यांच्या कुटुंबियांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टीने कॅशलेस कार्ड योजना राबवावी अशा सूचना दिल्या. समान काम–समान वेतन लागू करणे, धुलाई भत्ता वाढविणे याबाबतही कार्यवाही करण्याचे सूचित करण्यात आले.

### सुविधा देण्याचे निर्देश

सफाई कर्मचारी हे शहराचे आरोग्य सुरक्षित ठेवण्याचे अत्यंत महत्वाचे काम सैनिकाच्या निष्ठेने करत असून त्यांच्या कामाप्रती आदर राखत त्यांना जास्तीत जास्त सुविधा देण्यासाठी महानगरपालिकेने कटिबध्द राहावे, असे महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग रुक्कानसिंग डागोर यांनी आढावा बैठकीवेळी सूचित केले.

# नवी मुंबई विमानतळावरून दररोज २३ विमाने घेणार झेप

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट (एनएमआयए) २५ डिसेंबर २०२५ रोजी सुरू होणार आहे. ८ ऑक्टोबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते विमानतळाचे उद्घाटन होत काळजीपूर्वक टप्प्याटप्प्याने तयारी सुरू करण्यात आली होती. मुंबई महानगर क्षेत्राच्या (एमएमआर) वाढत्या विमान वाहतूक गरजांमध्ये अधिक क्षमतेची भर पडून एअर ट्रॅफिक कमी होण्यास मदत होणार आहे.

पहिल्या महिन्यामध्ये एनएमआयए सकाळी ८ वाजल्यापासून रात्री ८ वाजेपर्यंत १२ तास कार्यरत असेल, जेथे दररोज २३ नियोजित फ्लाइट्स असतील. या कालावधीदरम्यान एअरपोर्ट प्रतितास जवळपास १० फ्लाइट्सचे व्यवस्थापन करणार आहे. एनएमआयए येथे आगमन करणारी पहिली फ्लाइट बंगळुरूपासून येणारी इंडिगो ६ए४६० असेल, जी सकाळी ८ वाजता एअरपोर्टवर उतरेल. ज्यानंतर इंडिगो ६ए८८२ सकाळी ८.४० वाजता हैदराबादसाठी उड्डाण घेईल. ही सेवा नवीन एअरपोर्टवरून पहिली आऊटबाऊंड सेवा असेल.

प्रवाशांना इंडिगो, एअर इंडिया एक्स्प्रेस व आकासा एअरद्वारे ऑपरेट केल्या जाणाऱ्या सेवांचा फायदा होईल, ज्या मुंबईला १६ प्रमुख देशांतर्गत स्थळांशी जोडण्यात येणार आहेत. फेब्रुवारी २०२६ पासून हे एअरपोर्ट २४ तास सेवा देईल, एमएमआरच्या वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी दररोज ३४ फ्लाइट्स उड्डाण घेतील. २९ ऑक्टोबरपासून सीआयएसएफकडून सुरक्षा यंत्रणा उभारण्यात आली आहे.

# पोलीस प्रशासनातर्फे नशामुक्त उरण अभियान

**उरण : बातमीदार**

उरण पोलीस प्रशासन विभागाने व्यसनमुक्त आणि सुरक्षित समाज निर्माण करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण उपक्रम राबवला आहे नशामुक्त उरण अभियान या मोहिमेचा उद्देश व्यसनमुक्तीबाबत जनजागृती करणे, मदत उपलब्ध करून देणे आणि अल्कोहोल व ड्रग्जच्या व्यसनात अडकलेल्या व्यक्तींना मार्गदर्शन करणे हा आहे.



या उपक्रमाचा एक भाग म्हणून, अल्कोहोलिक्स ॲनॉनिमस आणि नार्कोटिक्स ॲनॉनिमस यांच्या मोफत मदतीसाठी सूचना व मार्गदर्शन फलक उरण परिसरातील प्रमुख ठिकाणी बसविण्यात आले आहेत. या सामाजिक कार्यासाठी आवश्यक परवानग्या उपलब्ध करून दिल्याबद्दल आणि सतत सहकार्याबद्दल आम्ही सीनियर पोलीस निरीक्षक हनीफ मुलानी यांचे मनापासून आभार मानतो. त्यांच्या सहाय्यामुळे उरणमधील नागरिकांसाठी ही महत्त्वाची सेवा सहज उपलब्ध झाली आहे. असे आभार आशीर्वाद ग्रुपतर्फे मानण्यात आले.

नशामुक्त उरण अभियान अधिक प्रभावी करण्यासाठी उरण पोलीस विभाग सर्व नागरिकांना आवाहन करतो की त्यांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा आणि व्यसनमुक्तीबाबत जागृती पसरवावी. सामूहिक प्रयत्नांद्वारे आपण उरणला अधिक निरोगी आणि व्यसनमुक्त बनवू शकतो.असे आवाहन पोलीस प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

### ‘अल्कोहोलिक्स ॲनॉनिम’चे पाऊल

अल्कोहोलिक्स ॲनॉनिमस ही जगभरातील एक आत्मीयता–आधारित संस्था आहे, जिथे मद्यपानाच्या व्यसनाशी झुंजणाऱ्या व्यक्ती एकत्र येऊन एकमेकांना आधार देतात. १२–स्टेप कार्यक्रमाद्वारे व्यक्तीला संयम प्राप्त करण्यास आणि टिकविण्यास मदत करते.

### नार्कोटिक्स ॲनॉनिमस..

नार्कोटिक्स ॲनॉनिमस ही ड्रग्जच्या व्यसनात अडकलेल्या व्यक्तींना मदत करणारी जागतिक संस्था आहे. १२–स्टेप कार्यक्रमाद्वारे सदस्यांना सुरक्षित वातावरणात अनुभव शेअर करण्याची आणि पुनर्वसनाच्या दिशेने वाटचाल करण्याची संधी देते.

# मोहोपाडा येथे विकासकामांचे उद्घाटन व भूमिपूजन

## नागरिकांना मिळणार विविध सुविधा; जनहिताला प्राधान्य

**मोहोपाडा, चौक : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात ६६ हजार लोकसंख्या असणारी वासांबे मोहोपाडा ही सर्वांत मोठी ग्रामपंचायत म्हणून ओळख आहे. या ग्रामपंचायतीचा विस्तार व लोकसंख्या पाहता मिळणारा फंड हा तुटपुंजा आहे. यासाठी ग्रामपंचायत कमिटी नेहमीच प्रयत्नशील असते. ग्रुप ग्रामपंचायत वासांबे हद्दीतील विविध विकासकामांचे मंगळवारी (दि. १७) सरपंच उमा मुंढे, सदस्य रसिका खराडे, प्रतीक्षा राऊत, आकाश जुईकर यांच्या हस्ते उद्घाटन व भूमिपूजन करण्यात आले.



यातच विजय म्हस्कर ते मनोज तांबोळी रस्ता, वैभव खराडे ते विनायक मुंडे रस्ता, अमित शहा ते अविनाश धुरव रस्ता व इतर विकासकामे व्हावीत, यासाठी ग्रामस्थांनी आर्थिक बजेट ग्रामसभेत विषय उपस्थित केले. शिवाय दोन वर्षांअगोदर ग्रामपंचायतीला लेखी निवेदनही दिले होते. अखेर सदर समस्या लक्षात घेवून सरपंच व सदस्यांनी लक्ष घालून मंगळवारी विकासकामांचा श्रीगणेशा केला. या वेळी मोहोपाडा मासळी बाजार ते सार्वजनिक शौचालयापर्यंत कॉक्रीट सांडपाणी गटार बांधकाम, भालचंद्र राऊत ते गणेश भोईर कॉक्रीट सांडपाणी गटार, श्री दत्त मंदिरासमोर ब्लॉक बसवून बंदिस्त सांडपाणी गटार करणे, मोहोपाडा अंगणवाडी सुशोभीकरण करणे आदी कामांचे उद्घाटन करण्यात आले, तर विजय म्हसकर ते मनोज तांबोळी रस्ता कॉक्रीटीकरण, वैभव खराडे ते विनायक मुंढे रस्ता कॉक्रीटीकरण, अविनाश धुरव ते अमित शहा रस्ता कॉक्रीटीकरण, प्रविण गीध ते श्री दत्त मंदिर सांडपाणी गटार, रमेश भंडारकर ते मनोहर धोत्रे रस्ता आदी कामांचे भूमिपूजन करण्यात आले.

या वेळी माजी सरपंच संदीप मुंढे, माजी सरपंच रोशन राऊत, माजी सभापती रमेश पाटील, सुरेश म्हात्रे तसेच राकेश खराडे, हेमंत चाळके, अजित सावंत आदींसह परिसरातील पदाधिकारी, पत्रकार व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाजप महायुतीची उरणमध्ये प्रचार रॅली



**उरण : वार्ताहर**

उरण नगर परिषद निवडणूक असल्याने उरण शहरात प्रचार रॅलीला सुरुवात झाली असल्याने मंगळवारी (दि.१८) प्रभाग क्र.७ चे अधिकृत उमेदवार शाहिस्ता इब्राहीम कादरी व अधिकृत उमेदवार रवी यशवंत भोईर व भाजप महायुतीच्या नगराध्यक्ष पदाच्या अधिकृत उमेदवार शोभा कोळी–शाह यांच्यासह सर्व कार्यकर्त्यांनी बाजारपेठेत प्रचार रॅली काढली होती.

या वेळी भाजप उरण शहर अध्यक्ष कौशिक शाह, निता महेश बालदी, भाजप उरण तालुका ग्रामीण मंडळ अध्यक्ष धनेश गावंड, तालुका सरचिटणीस सुनील पाटील, उरण शहर युवा अध्यक्ष निलेश पाटील,रवी कुलकर्णी, मनोहर सहतिया, प्रसाद पाटील, उरण शहर मंडळ अध्यक्ष प्रसाद भोईर, कैलास भोईर, स्नेहल कासारे, निशा म्हात्रे, प्रेम मढवी आदी शेकडो कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# रिअल इस्टेटमध्ये एआय आणि ग्रीन बिल्डिंगवर माहितीपूर्ण सेमिनार

**पनवेल : वार्ताहर**

क्रेडाई एमसीएचआय (CRED-I MCHI) रायगड युनिटने मॅरियट एक्झिक्युटिव्ह अपार्टमेंट्स नवी मुंबई येथे रिअल इस्टेटमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ग्रीन बिल्डिंग या विषयावर एक माहितीपूर्ण सेमिनार आयोजित केला होता. या कार्यक्रमाला नवी मुंबई आणि रायगड विभागातील सुमारे ७५ बांधकाम व्यावसायिक आणि डेव्हलपर्सनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. तसेच या क्षेत्रातील विविध बांधकाम व्यावसायिक संघटनांचे पदाधिकारीही उपस्थित होते.



या सेमिनारमध्ये केसरी इन्फ्राबिल्ड एलएलपीचे संचालक के. श्रीनिवासन यांनी ग्रीन बिल्डिंगवर सखोल सादरीकरण करत ग्रीन बिल्डिंग संकल्पना स्वीकारण्याचे महत्त्व सांगितले आणि ती लागू केल्याने बांधकाम व्यावसायिकांना होणाऱ्या विविध फायद्यांवर प्रकाश टाकला. तर कायझेन एआयचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी जय शाह यांनी रिअल इस्टेटमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेच्या भूमिकेबद्दल मौल्यवान माहिती देत प्लॅनिंग नियमांचे उल्लंघन न करता अतिरिक्त बिल्ट–अप एरिया तयार करण्यासाठी मोकळ्या जागांचा वापर ऑप्टिमाइझ करण्याच्या अभिनव पद्धती समजावून सांगितल्या. दोन्ही वक्त्यांनी आपापल्या विषयांवर अत्यंत माहितीपूर्ण आणि दूरदृष्टीकोन असलेले विचार मांडले. पनवेल महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त गणेश शेट्ये आणि क्रेडाई एमसीएचआयचे सीओओ केवल वळंभिया या सेमिनारला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

अतिरिक्त आयुक्त गणेश शेट्ये यांनी भाषणात सदस्यांना पनवेल महानगरपालिकेच्या महत्त्वाकांक्षी आणि आक्रमक वृक्षारोपण मोहिमेबद्दल माहिती दिली, ज्यामध्ये त्यांच्या कार्यक्षेत्रात १ लाख झाडे लावण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तर क्रेडाई एमसीएचआय रायगडचे अध्यक्ष अरविंद सावळेकर यांनी सर्व बांधकाम व्यावसायिक आणि डेव्हलपर्सच्या उत्स्फूर्त सहभागाबद्दल स्वागत केले. या कार्यक्रमासाठी आयोजनासाठी उपाध्यक्ष हितेंद्र घाडिया, समिती सदस्य प्रतीक पोटे, आशियान खोत, जितेश अग्रवाल, अनिरुद्ध सावळकर, तसेच इतर व्यवस्थापकीय समिती सदस्यांनी मोठे योगदान दिले.

# बंदर कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत सकारात्मक बैठक

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय पोर्ट व डॉक मजदूर महासंघाची मुंबई बंदर प्राधिकरणाचे अध्यक्ष एम. अंगमुथु यांच्याशी मुंबई येथे सोमवारी (दि.१७) एक महत्त्वपूर्ण बैठक झाली. या बैठकीमध्ये बंदर कामगारांच्या प्रलंबित राहिलेल्या प्रश्नांवर आणि विविध मुद्द्यांवर सकारात्मक चर्चा करण्यात आली.

या बैठकीला भारतीय पोर्ट व डॉक मजदूर महासंघाचे महासचिव सुरेश पाटील, मुंबई पोर्ट ट्रस्ट मजदूर संघ युनियनचे सलाहकार प्रभाकर उपरकर, कार्यकारी अध्यक्ष प्रवीण मंचेकर, अध्यक्ष सुधीर तिवरेकर, उपाध्यक्ष स्नेहल मोरे व विशाखा मांजरेकर, महासचिव दीपक जादव, सचिव श्रीमती श्रेया शेळके व विलास काळे, कोषाध्यक्ष सुरेश अराली, कार्यकारी सदस्य संजय तावडे, रवींद्र धोत्रे व ज्ञानेश्वर सोनवणे उपस्थित होते.

बैठकीमध्ये युनियन कार्यालयासाठी व्यवस्था करणे, मेडिकल विभागात रिक्त पदे भरणे, एमएसीपीचे ठकबाकी, पोर्ट फायर सर्व्हिस, पोर्ट विभागात रिक्त पदे भरणे, सेक्शन लीडर आणि सिनियर सेक्शन लीडर पदांसाठी होणारी परीक्षा रद्द करणे, सब सेक्शन लीडर पदावर बढतीसाठी डीपीसी हिंदी आणि मराठी भाषांमध्ये घेण्याबाबतच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली.



# मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये जागतिक मुदतपूर्व प्रसूती दिन साजरा

**पनवेल : वार्ताहर**

जागतिक मुदतपूर्व प्रसूती (प्रिमॅच्युअर) दिनानिमित्त नवी मुंबईतील मेडिकव्हर हॉस्पिटलने द टायनी मिरॅकल्स या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करत अकाली जन्मलेल्या बाळांच्या धैर्याचा आणि प्रेरणादायी प्रवासाचा सन्मान केला. ब्लू प्लॅनेट येथे आयोजित या कार्यक्रमात डॉक्टर, परिचारिका, पालक आणि ५० हून अधिक चिमुकल्या योद्ध्यांचा समावेश होता.



सामान्यतः मूल आईच्या गर्भात ३७ आठवडे राहत, परंतु ३७ आठवड्यांपूर्वीच प्रसूती झालेली मुले अपुऱ्या दिवसांची असतात. म्हणजेच त्यांना प्रिमॅच्युअर बेबी म्हणतात. जागतिक स्तरावर दर दहापैकी एक बाळ अकाली जन्मते. वैद्यकीय प्रगतीमुळे जगण्याचा दर वाढला असला तरीदेखील ही एक गंभीर आरोग्यविषयक समस्या आहे.

कार्यक्रमादरम्यान जागरूकता सत्रे, पालक–डॉक्टरांचा संवाद, संपुर्ण प्रवासादरम्यानचे अनुभव सांगणे, काही खास मनोरंजनात्मक उपक्रम आणि लहान मुलांसाठी आकर्षक खेळांचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांद्वारे पालकांना अकाली बाळांची काळजी कशी घ्यावी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले आणि या ठिकाणी उपस्थित तज्ज्ञांशी संवाद साधण्याची संधी मिळाली.

मेडिकव्हर हॉस्पिटलचे महाराष्ट्र व कर्नाटक प्रदेशाचे प्रादेशिक संचालक नीरज लाल सांगतात की, जागतिक अकाली जन्म दिन हा या लहान योध्यांचा प्रेरणादायी प्रवास आणि नवजात शिशु विभागातील वैद्यकीय सेवांच्या उलगडा करणारा आहे. या कार्यक्रमाद्वारे मेडिकव्हर हॉस्पिटलने अकाली जन्मलेल्या चिमुकल्या योध्यांचा प्रेरणादायी प्रवास साजरा करत त्यांच्या कुटुंबियांचे आणि वैद्यकीय तज्ञांचे याठिकाणी आभार मानले.

# माहिती नोंदणीसाठी कायमस्वरूपी प्रोग्रामरची गरज

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून प्रोबिटी सॉफ्टवेअर प्रायव्हेट लिमिटेडया कंपनीला महापालिकेच्या डिजिटल सिस्टीमसाठी निविदा प्रक्रिया राबवून नियुक्त करण्यात आले आहे. ही साफ्टवेअर कंपनी सद्यस्थितीत महापालिकेचा लेखा विभाग, मालमत्ताकर विभाग, शहर अभियंता विभाग इत्यादी विभागाला सेवा पुरवत आहे. मागील हैदराबाद येथील मार्स कंपनीकडून महापालिकेचा संपूर्ण डेटा आपल्याकडे हस्तांतरित करून महापालिकेच्या आय. टी क्षेत्रातील तज्ञ प्रोग्रॅमर यांचे मार्गदर्शन घेऊन सदर ही नविन कंपनी कार्यरत आहे. मालमत्ताकर विभाग हा महापालिकेचा महत्वपूर्ण आर्थिक स्त्रोत आहे, मात्र हे काम प्रोबिटी सॉफ्टवेअर प्रायव्हेट लिमिटेडया कंपनीचे खाजगी कर्मचारी करत आहेत. त्यामुळे अनेकदा कामास विलंब होत आहे.

त्यामुळे या पूर्वी सदर विभागाचा जबाबदार व कायमस्वरूपी सेवेत असलेला प्रोग्रॅमर/माहिती नोंदणीकार विभागास पूर्ण वेळ उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी भाजपाचे सुधीर पाटील यांनी आयुक्तांकडे केली आहे.

पालिकेचा कर्मचारी यावरही ही जबाबदारी हाताळायचा पूर्वीच्या सॉफ्टवेयर कंपनीकडून कामे जलद गतीने करून घ्यायचा. देयकामधील छोट्या मोठ्या दुरूस्त्या, मालमत्तांच्या नोंदी अपडेट ठेवणे, मालमत्तांचे विभाजन करणे, देयक जनरेट करणे इत्यादी कामं जबाबदारीने करायचा, परंतू सद्यस्थितीत ही सर्व कामं प्रोबिटी सॉफ्टवेअर प्रायव्हेट लिमिटेडया कंपनीचे खासगी कर्मचारी करत आहेत. त्यामुळे महापालिकेस अपेक्षित असलेली कामे जलद गतीने होत नाहीत. मागील काही महीने तसेच वर्षांपूर्वीपासून नागरीकांकडून करण्यात आलेल्या प्रलंबित अर्जांची विभाग निहाय डेली डिस्पोजल नोंदी तपासल्यास त्याचा खोळंबा झालेला दिसून येत आहे.

महापालिकेचा कायमस्वरूपी सेवेत असलेला प्रोग्रॅमर/माहिती नोंदणीकार यांना डावलून सदर कंपनी आपल्या खाजगी कर्मचाऱ्यांकडून देयकांमधील छोट्या मोठ्या दुरूस्त्या, मालमत्तांच्या नोंदी अपडेट ठेवणे, मालमत्तांचे विभाजन करणे, देयक जनरेट करणे इत्यादी कामे करून घेत आहेत. वास्तविक पाहता ही जबाबदारी महापालिकेच्या कायमस्वरूपी सेवेत असलेल्या प्रोग्रॅमरची आहे.

सारासार विचार करून मालमत्ताकर विभागास महापालिकेचा कायमस्वरूपी सेवेत असलेला महापालिकेस जबाबदार असलेला प्रोग्रॅमर/माहिती नोंदणीकार लवकरात लवकर उपलब्ध करुन देण्यात यावा, अशी मागणी पाटील यांनी केली आहे.

# जिल्ह्यात व्होकल फॉर लोकलचा नारा

## दोन दिवसीय कौशल्य विकास विशेष उपक्रम




**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

जन शिक्षण संस्थान रायगड, सी.एस.आर जे.एन.पी.टी-मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्ह्यातील कौशल्य विकास प्रशिक्षण देणारे साधन व्यक्ती, विद्यार्थी, व कर्मचारी यांच्याकरिता सी.एस.आर जे.एन.पी.टी मुंबई यांच्या आर्थिक सहकार्यातून दिनांक १८ व १९ नोव्हेंबर २०२५ हे दोन दिवसीय कौशल्यवृध्दी व क्षमता बांधणी प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन मंगळवारी (दि.१८) सहाण-अलिबाग येथे संपन्न झाले.

या कार्यक्रमा प्रसंगी अन्न प्रक्रिया कार्यशाळा पर्यटन विकासास प्रेरक असल्याचे मत संस्थापक अध्यक्षा डॉ. मेधा सोमैया यांनी व्यक्त केले तर व्होकल फॉर लोकल साठी अशा प्रशिक्षणाची नितांत गरज असल्याचे मत अध्यक्ष डॉ. नितीन गांधी यांनी कार्यक्रमाप्रसंगी व्यक्त केले जे.एस.एस रायगड व सी.एस.आर जे. एन.पी.टी.मुंबई मुळे आत्मनिर्भर भारत संकल्पनेला प्रेरणा दिली जात असल्याचे मत सीएसआर जे. एन. पी. टी मुंबईचे मॅनेजर सयाजी साळुंके यांनी कार्यक्रमाप्रसंगी व्यक्त केले.

जन शिक्षण संस्थान रायगडच्या संस्थापक अध्यक्षा डॉ. मेधा सोमैया, अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, उपाध्यक्षा रत्नप्रभा बेल्हेकर, संचालक डॉ. विजय कोकणे, सीएसआर जे. एन. पी. टी मुंबईचे मॅनेजर श्री. सयाजी साळुंके, कृषी विभाग जिल्हा प्रशिक्षक दयानंद चतुर व प्रशिक्षक सोनिया पाटील या मान्यवरांच्या व प्रशिक्षकांच्या उपस्थितीत उद्घाटन कार्यक्रम झाला.

दोन दिवसांच्या प्रशिक्षण शिबिरामध्ये अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांचा सदुपयोग हि काळाची गरज- व्हिएतनाम दौऱ्याचे अनुभव या विषयावरती डॉ. मेधा के. सोमैया, समतोल आहाराचे महत्व या विषयावरती डॉ. नितीन गांधी, फ्रुट अँड व्हेजिटेबल प्रोसेसिंग अँड प्रिझर्वेशन या विषयावरती सोनिया पाटील, अन्न प्रक्रिया व त्यामधील उद्योगाच्या संधी या विषयावरती श्री. दयानंद चतुर, सुखवानी यंत्रातील तयार प्रोडक्टचे बहू उपयोगी फायदे व विक्री व्यवस्थापन- यशस्वी उद्योजकाची मुलाखत या विषयावरती रत्नप्रभा बेल्हेकर ह्यांचे मार्गदर्शन मिळणार आहे.

---

रयत शिक्षण संस्थेचे,

**महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पनवेल**

**जि. रायगड**

**निविदा सूचना**

महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पनवेल शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या 'प्रेरणा' नियतकालिकाच्या छपाईकरिता खालील तपशीलानुसार निविदा मागवित आहोत,

साईज : '८.५ x११.२९' (ए४) (२९x२१ सीएम)

एकूण नग : १५०००

| अ.क्र. | तपशील | पेपर प्रत्त | संख्या | पेपर (दर) | एकूण किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | कव्हर छपाईसह लॅमिनेशन | ३०० आर्ट पेपर डी. टी.पी. व डिझाईनसह | ०४ | | |
| २ | मॅटर छपाई | ७० GSM मॅपली पेपर पाठपोठ | ११४ | | |
| ३ | फोटो पेज | १३० GSM पाठपोठ | २० | | |
| ४ | विभाग पेज ब्लॅक अॅण्ड व्हाईट | १०० GSM आर्ट पेपर एक पाठपोठ | १६ | | |
| ५ | बायडिंग चार्जेस | साईड पिनिंग अॅण्ड कव्हर पेस्टिंग | | | |
| ६ | | | १५४ | एकूण | |
| ७ | | पर कॉपी रेट | | | |

सदर निविदा विहित नमुन्यात दिनांक २०/११/२०२५ ते २७/११/२०२५ पर्यंत सकाळी १०.०० ते सध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत महाविद्यालयाच्या कार्यालयात जमा करावी, निविदा उघडण्याच्या तारखेची माहिती सबंधित कंत्राटदारांना दिली जाईल.

**सही/-**
**प्राचार्य**
**महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय पनवेल**

---

# रोहा अष्टमी नगर परिषद निवडणुकीच्या थेट नगराध्यक्षपदासाठी तीन उमेदवारी अर्ज

## नगरसेवकपदाच्या २० जागांसाठी ७८ उमेदवारी अर्ज दाखल

**रोहा : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील प्रतिष्ठीत असलेल्या रोहा अष्टमी नगरपरिषद निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी सारेच पक्षांच्या उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी गर्दी दिसून आली. मोठ्या प्रमाणात उमेदवार आपल्या समर्थकांसह दाखल झाले होते. रोहा अष्टमी नगर परिषदेसाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून तहसीलदार किशोर देशमुख यांनी उमेदवारी अर्ज स्विकारले.

अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी रोहा अष्टमी नगर परिषदेच्या थेट नगराध्यक्षपदासाठी शिवसेना शिंदे गट कडुन शिल्पा धोत्रे, राष्ट्रवादी (अजित पवार गट) कडुन वनश्री शेडगे, शिवसेना (उबाठा) कडुन नेहा गुरव यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

रोहा हॉस्पिटलच्या अष्टमी नगर परिषदेच्या २० जागेसाठी राष्ट्रवादी (अजित पवार गट) शिवसेना (शिंदे गट) शिवसेना (उबाठा) भारतीय जनता पक्ष व अपक्ष असे एकूण ७८ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत.

आज दाखल केलेल्या उमेदवारी अर्ज मध्ये राष्ट्रवादी पक्षाकडुन प्रभाग १ निता हजारे, प्रशांत कडु, प्रभाग क्रमांक २ फराह पानसरे, राजेंद्र जैन, प्रभाग क्रमांक ३ अफरीन रोगे, अरबाझ मणेर, प्रभाग क्रमांक ४ स्नेहा आंबरे, अहमद दर्जी, प्रभाग क्रमांक ५ आलमास मुमैरे, महेंद्र गुजर, प्रभाग क्रमांक ६ गौरी बारटक्के, महेंद्र दिवेकर, प्रभाग क्रमांक ७ प्रियंका धनावडे, रवींद्र चाळके, प्रभाग क्रमांक ८ संजना शिंदे, महेश कोलाटकर, प्रभाग क्रमांक ९ अश्विनी पवार, समिर सकपाळ, प्रभाग क्रमांक १० पुर्वा मोहीते, अजित मोरे आदींनी उमेदवारी अर्ज दाखल केले. शिवसेना (उबाठा) प्रभाग क्रमांक १ सुनीता पाचंगे, मनोज लांजेकर, प्रभाग क्रमांक २ संजय देऊळकर, प्रभाग क्रमांक ६ बेबीताई देशमुख, राजेश काफरे, प्रभाग १० नेहा गुरव, ओंकार गुरव यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

भाजपकडुन प्रभाग ६ पी.व्ही. ज्योती सनिलकुमार, प्रभाग क्रमांक ९ रोशन चाफेकर, प्रभाग १० स्मिता घरत, सुमीत रिजबुड यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

राष्ट्रवादी (अजित पवार गट) पक्षाचे उमेदवारी अर्ज दाखल करताना खासदार सुनील तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे, समिर शेडगे, अमित उकडे, महेश कोलाटकर, महेंद्र गुजर, राजेंद्र जैन, अहमद दर्जी, शिवसेनेचा (शिंदे गट) अर्ज दाखल करताना शिवसेना (शिंदे गट) तालुकाप्रमुख मनोजकुमार शिंदे, लालताप्रसाद कुशवाह, अशोक धोत्रे, उस्मान रोहेकर, नितीन तेंडुलकर, शहर अध्यक्ष मंगेश रावकर, शहर अध्यक्षा अॅड. मयूरा मोरे, प्रकाश कोळी, भुतकर, आशिष स्वामी, तर शिवसेना (उबाठा) पक्षाच्या उमेदवारांचे अर्ज दाखल करताना शिवसेना (उबाठा) पक्षाचे तालुका प्रमुख नितीन वारंगे, विष्णु लोखंडे, सचिन फुलारे, यतीन धुमाळ, रमेश विचारे, राजेश काफरे, भारतीय जनता पार्टीचे अर्ज दाखल करताना तालुका अध्यक्ष अमित घाग, रोशन चाफेकर, रिया कासार आदी उपस्थित होते.

# कर्जतमध्ये ३८ अर्ज अवैध

**कर्जत :** नगर परिषदेच्या निवडणुकीसाठी एकूण शंभर नामनिर्देशन पत्र दाखल करण्यात आली होती. त्यापैकी माजी नगरसेविका शीतल लक्ष्मीकांत लाड यांच्या नामनिर्देशन पत्रावर सुचकाची सही नसल्याने त्यांचा अर्ज अवैध ठरला. तसेच अजून ३७ नामनिर्देशन पत्र अवैध ठरली म्हणजे एकूण ३८ नामनिर्देशन पत्र अवैध ठरली. तर काही उमेदवारांनी एका पेक्षा जास्त नामनिर्देशन पत्र दाखल केली होती. त्यामुळे प्रत्यक्षात नगराध्यक्ष पदासह ६२ उमेदवारांची नामनिर्देशन पत्र वैध ठरली आहेत. यामध्ये पाच नगराध्यक्ष पदासाठी तर ५७ नगरसेवक पदासाठीचे उमेदवार आहेत.

आज नामनिर्देशन पत्रांची छननी होती. माजी नगरसेविका शीतल लक्ष्मीकांत लाड यांच्या अर्जावर सुचकाची सही नसल्याने त्यांचा अर्ज अवैध ठरला.

सध्या ६२ उमेदवारांची नामनिर्देशन पत्र वैध ठरली असली तरी १९ ते २१ नोव्हेंबर या कालावधीत उमेदवारी अर्ज मागे घेण्यात येणार आहे. त्यानंतरच प्रत्यक्ष निवडणूक रिंगणात कोण असेल हे स्पष्ट होईल.

---

**ग्रुप ग्रामपंचायत लोधिवली**

**लोधिवली, ता.खालापूर, जि. रायगड**

**विकास कामे जाहिरात**

ग्रामपंचायत लोधिवली हद्दीतील ग्रामनिधी अंतर्गत सन २०२५-२६ या वर्षाच्या करिता खालील प्रमाणे विकासकामे करावयाची आहे. त्याकरिता ग्रामपंचायत हद्दीतील अधिकृत/अनुभवी ठेकेदारांकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामांच्या कोऱ्या निविदा मिळण्याकरिता अर्जाची तारीख दि. १९/११/२०२५ ते दि.२५/११/२०२५ पर्यंत या दिवशी कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात मिळतील.

सदर निविदा दि.२६/११/२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील. सदर निविदा त्याच दिवशी कार्यालयीन वेळेत उघडण्यात येतील किंवा ग्रामपंचायत ठरवेल त्या दिवशी उघडण्यात येतील. कामांकरिता लागणारी इसारा रक्कम ग्रामपंचायत लोधिवली यांच्या नावाने डिमांड ड्राफ्टच्या द्वारे/रोखीने स्वीकारण्यात येतील. कोणतीही एक निविदा मंजूर करणे अगर नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव व योजना नाव | निधी | अ. रक्कम | निविदा फी | इसारा रक्कम | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | लोधिवली साधुराम पाठारे यांचे घर ते धनाजी भुईकोट यांच्या घरापर्यंत विद्युत अंडर ग्राऊंड लाईन टाकणे. | ग्रामनिधी सन २०२५-२६ | २००००० | ५०० | १% | ६ महिने. |
| २ | मौजे वरोसे बौद्धवाडी येथील सार्वजनिक शौचालय दुरुस्त करणे. | ग्रामनिधी १५% मा.खर्च सन २०२५-२६ | १००००० | २०० | १% | ६ महिने. |

**टीप:-**

१) निविदा भरणाऱ्या सर्व कंत्राटदारांनी दि. १९/११/२०२५ ते दि.२५/११/२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालय लोधिवली येथे सिलबंद लिफाफा जमा करणे बंधनकारक आहे.
२) निविदा भरताना आपले दर जी.एस.टी. वगळून भरणे बंधनकारक आहे. जी.एस.टी. चे दर संबंधित विभागाचे नियमाप्रमाणे लागू राहतील.
३) कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.
४) मुदतीनंतर आलेल्या खाडाखोड करून साक्षांकित न केलेल्या व अटीशर्तीयुक्त निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत.
५) सदर कामांच्या निविदा अंदाजपत्रक निविदा व अटी शर्ती बाबत कार्यातयात निविदा धारकास माहितीपत्रक देण्यात येईल.
६) कोणत्याही नामंजूर निविदासंदर्भात निविदा धारकास कोणत्याही प्रकारे लेखी स्वरुपात कळविले जाणार नाही.
७) निविदा मंजूर झालेल्या ठेकेदाराला ५०० रु च्या बॉड पेपरवर करारनामा करून द्यावा लागेल.
८) निविदे सोबत १% इसारा रक्कम रोखीने ग्रामपंचायत मध्ये सामान्य पावतीने भरणा करावी
९) काम सुरु करण्यापूर्वीचे फोटो, काम सुरु असतानाचे फोटो व काम पूर्ण झाल्यानंतरचे फोटो सादर केल्याशिवाय बिलाची रक्कम अदा केली जाणार नाही.
१०) ठेकेदार ग्रामपंचायतीचा येणे बाकीदार असल्यास निविदा रद्द करण्यात येईल.

**सही/-**
**महेश पुंडलिक म्हसे**
**ग्रामपंचयात अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत लोधिवली**

**सही/-**
**सौ. पूजा नितीन तवले**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत लोधिवली**

---

# ज्येष्ठ नागरिक संघाच्या केंद्रीय सुरक्षा समिती सदस्यपदी नयन कर्णिक

**मुरूड : प्रतिनिधी**



मुरूड शहरात वास्तव्यास असणारे माजी तहसीलदार नयन कर्णिक यांची रायगड जिल्हा ज्येष्ठ नागरिक संघाच्या समन्वय समितीच्या केंद्रीय सुरक्षा समिती सदस्य पदी निवड जाहीर करण्यात आली आहे. रायगड जिल्ह्यातून २१ लोकांची निवड करण्यात आली आहे. जिल्हा अध्यक्ष सुरेश पालकर यांनी ही निवड जाहीर केली आहे.

नयन कर्णिक हे सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक कार्यात नेहमीच समरस होऊन काम करीत असतात. मुरूड तालुका ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष पद गेले कित्येक वर्ष भूषविले आहे. कोटेश्वर देवस्थान समितीचे अध्यक्ष असून प्रत्येक विभागात स्वीकारलेली जबाबदारी मोठ्या आस्थेने ते पूर्ण करीत आहेत. शांत स्वभाव व प्रत्येकाला सहकार्य करण्याची प्रामाणिक वृत्ती असल्याने मुरुड शहरात ते नामांकित व्यक्तिमत्व म्हणून परिचित आहेत. त्यांची ही निवड जाहीर होताच ज्येष्ठ नागरिक व समाजातील विविध स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# उरणमध्ये ८७ अर्ज दाखल

**उरण : प्रतिनिधी**

उरण शहरात सर्वच राजकीय पक्षांनी व अपक्षांनी नामनिर्देशन पत्र दाखल करण्यासाठी १० नोव्हेंबर पासून सुरुवात केली होती. मोठ्या संख्येने शक्ती प्रदर्शनासह ढोलतशाच्या गजरात संपूर्ण उरण शहरातून रॅली काढून नाम निर्देशन पत्र दाखल केले.

सोमवारी १७ नोव्हेंबर रोजी निवडणूकीचे नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी दुपारी २ वाजेपर्यंत नगराध्यक्ष पदाच्या एका जागेसाठी भाजपा महायुती, शिवसेना (ठाकरे गट) - कॉंग्रेस - राष्ट्रवादी कॉंग्रेस - मनसे आघाडी व शिवसेना (शिंदे गट)अजित पवार राष्ट्रवादी कॉंग्रेस यांच्यासह अपक्ष असे एकूण ९ अर्ज दाखल करण्यात आले आहेत.

दहा प्रभागातील नगरसेवकांच्या २१ जागांसाठी एकूण ७८ उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आल्याची माहीती उरण नगर परिषदेचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा उरणचे तहसीलदार डॉ. उद्धव कदम यांनी दिली आहे.

---

**जप्त केलेल्या व ताबे कब्जात असलेल्या स्थावर मालमत्तेच्या विक्रीची फेर जाहिर नोटीस**

**जा. क्र. ३१/५५१/२०२५-२०२६, वसुली-स्थावर जाहीरनामा**
**वसुली अधिकारी यांचे कार्यालय**
**दिनांकः १८/११/२०२५**

ज्या अर्थी कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल या संस्थेच्या कर्जाची थकबाकी अधिक व्याज रक्कम रु. २३,१०,०२४/- (अक्षरी रुपये तेविस लाख दहा हजार चोवीस मात्र) अधिक दि. १९/११/२०२५ पासूनचे पुढे होणारा व्याज येणेपोटी श्री. रामदास भिकाजी जाधव रा. कामोठे, जुही अपार्टमेंट, रूम नं-डी/१०२, पहिला मजला, प्लॉट नं-६३अे, सेक्टर-६अे, ता-पनवेल, जि-रायगड यांची खाली नमुद केलेली मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. ज्या अर्थी सदरील रक्कम जप्तीमुळे व विक्रीमुळे उद्भवणाऱ्या कायदेशीर भार व खर्च वसुली करीता उक्त मालमता जाहीर लिलाव पद्धतीने विकणे आवश्यक वाटल्यावरून अशी नोटीस देण्यात येते की, सदर श्री. रामदास भिकाजी जाधव रा. कामोठे, जुही अपार्टमेंट, रूम नं-डी/१०२, पहिला मजला, प्लॉट नं-६३अे, सेक्टर-६अे, ता-पनवेल, जि-रायगड यांनी उक्त स्थावर व तिच्यापासून मिळणारा ओगवटा व तिची अगर त्यामधील काही भागाची विल्हेवाट लावून मिळणारा लाभांश या प्रकारच्या हक्कांचा सोबत जोडलेल्या लिलावाच्या अटी व शर्तीस व ठरवलेल्या किंमतीस (अपसेट प्राईज) यांना अधिन राहून जास्तीत जास्त बोली बोलणाऱ्यास दि. ०८/१२/२०२५ रोजी सकाळी ११.०० ते दु. १.०० वाजता कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल श्री. सुनिल सदानंद गद्रे वसुली अधिकारी हे **जुही अपार्टमेंट, रूम नं-डी/१०२, पहिला मजला, प्लॉट नं-६३अे, सेक्टर-६अे, ता-पनवेल, जि-रायगड, कामोठे,** या मिळकतीचे जाहीर लिलावाने विक्री करतील.

**स्थावर मिळकतीचा तपशील**

| अ.क्र. | वसुली दाखला क्रमांक व दिनांक | ज्या पक्षकारविरुद्ध प्रमाणपत्र देण्यात आले असेल त्याचे नाव | गावाचे नाव व तालुका | गट नं. | क्षेत्र | आकारणी | कब्जेदार सदरी असणारे नाव | हक्क | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | दावा क्र. सी. सी/आर.जी. डी/३८/२०२३ दि. २७/०६/२०२४ | श्री. रामदास भिकाजी जाधव<br>श्री. गोविंद देवराम कदम<br>श्री. श्रीमंत केशव खांडेकर | कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड. | जुही अपार्टमेंट, रूम नं-डी/१०२, पहिला मजला, प्लॉट नं-६३अे, सेक्टर-६अे, ता-पनवेल, जि-रायगड, कामोठे | ३९४ चौ. फुट बिल्टअप | — | श्री. रामदास भिकाजी जाधव | नाही | |

उक्त मालमतेसंबंधी अन्य कोणत्याही व्यक्तीने प्रतीपादन करण्यात आलेला त्याचा मालकी हक्क भार अगर हितसंबंध याबाबतच्या खरेपणाची कसलीही हमी देण्यात येणार नाही. विक्री आदेश काढण्यात आलेल्या तारखेस धकबाकीदाराकडून देणे असलेली येणे बाकी अधिक व्याज रु. ३२,९९,८२५/- अधिक सरचार्ज व इतर खर्चाच्या वसुलीता विक्रीचा आदेश देण्यात आला आहे.

वसुली अधिकारी श्री. सुनिल सदानंद गद्रे यांनी उक्त मालमता यापूर्वीच जप्ती आदेश क्र. वसुली स्थावर जप्ती दिनांक ०९/०९/२०२५ जप्त करून ताब्यात घेण्यात आली.

**ठिकाण :- पनवेल**
**दिनांक :- १८/११/२०२५**

**सही/-**
**(सुनिल सदानंद गद्रे)**
**विषेश वसुली व विक्री अधिकारी,**
**वसुली अधिकारी**
**महाराष्ट्र स.स. अधिनियम १९६० चे**
**कलम १५६ चे नियम १०७ अन्वे अधिकार प्राप्त**

---

# हवेत गारवा; गावोगावी पेटू लागल्या शेकोट्या



**माणगाव : बातमीदार**

नोव्हेंबरच्या दुसऱ्या पंधरवड्यात हळूहळू थंडीने आपले अस्तित्व दाखवायला सुरुवात केली असून मागील दोन दिवसांपासून माणगांव व परिसरात रात्रीपासूनच गारवा वाढू लागला आहे. पहाटे दाट धुक्याची चादर तर दिवस ढळताच थंडगार हवा वाहू लागल्याने वातावरणात स्पष्टपणे थंडीची जाणीव होत आहे.

मंगळवारी सकाळी नोंदवलेले किमान तापमान १७AmoC इतके होते, तर रात्रीपासूनच बोचरी थंडी जाणवत असल्याने अनेक ठिकाणी नागरिक शेकोटीभोवती ऊब घेताना दिसले. उबदार कपड्यांचा- स्वेटर, ब्लँकेट, कानटोपी- वापर देखील वाढू लागला आहे. दिवाळीत जाणवणारी टिपिकल थंडी यंदा जवळपास महिनाभर उशिरा का होईना, पण प्रत्यक्षात जाणवू लागली आहे.

हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, ईशान्येकडील थंड वाऱ्यांचा वेग वाढल्याने बुधवारी सकाळी थंडीची तीव्रता आणखी वाढणार आहे. दिवसभर वातावरण सूर्यप्रकाशित आणि उबदार राहील; कमाल तापमान सुमारे ३४AmoC, तर रात्री किमान तापमान १६AmoC पर्यंत खाली येण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. विशेष म्हणजे, पावसाची शक्यता आता पूर्णतः ०% झाली आहे.

यंदाच्या लांबलेल्या आणि त्रासदायक पावसाळ्याची भीती नागरिकांच्या मनात अजूनही कायम असल्याचे सोशल मीडियावरील विनोदांवरून दिसून येते.

दरम्यान, अनेकांनी यंदा थंडी जोरदार पडेल अशी भाकीते व्यक्त केली आहेत. पावसाने हैराण झालेल्या नागरिकांना आता उशिरा का होईना, पण सुरू झालेली ही गुलाबी थंडी सुखावणार असल्याचे मत सर्वसाधारणपणे व्यक्त केले जात आहे.

दरम्यान, सद्याचे हवामान शेतीसाठी पोषक असल्याने शेतकरी वर्ग सुखावल्याचे चित्र जिल्ह्यात दिसत आहे.

---

**स्थावर मिळकतीचा जाहीर फेर लिलाव**

तमाम लोकांना जाहीर करण्यात येते की, कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल या संस्थेचे खालील नामनिर्देशित केलेले सभासद थकबाकीदार आहेत. त्यांचेकडील थकबाकीची रक्कम वसुल करणेसाठी त्यांच्या खालील स्थावर मिळकतीचा जाहीर लिलाव त्यांचे नावासमोर दर्शवलेल्या वेळी, रोजी, ठिकाणी होणार आहे. तरी, ज्यांना सदर मिळकतीच्या लिलावात बोली बोलून घ्यावयाची असेल त्यांनी संस्थेशी संपर्क साधून मिळकतीची प्रत व ठिकाण पाहून घ्यावे व लिलावाच्या दिवशी व वेळी उपस्थित रहावे.

| अ.क्र. | थकबाकीदाराचे नाव व पत्ता | मिळकत नं. व गट नं. ठिकाण | क्षेत्र हे. आर. | लिलाव करावयाचा हिस्सा | आकार रु. पै. | लिलावाची तारीख, वेळ व ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. रामदास भिकाजी जाधव मौजे कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड येथील जुही अपार्टमेंट, रूम नं-डी/१०२, पहिला मजला, प्लॉट नं-६३अे, सेक्टर-६अे | पनवेल महानगरपालिका यांचे हद्दीतील आणि सब-रजिस्ट्रार पनवेल यांचे अधिकार कक्षेतील मौजे कामोठे जुही अपार्टमेंट, रूम नं-डी/१०२, पहिला मजला, प्लॉट नं-६३अे, सेक्टर-६ अे, क्षेत्र ३९४ चौ. फुट बिल्टअप | ३९४ चौ. फुट बिल्टअप | ३९४ चौ. फुट बिल्टअप | | सोमवार दिः ०८/१२/२०२५ वेळः सकाळी ११.०० ते दुपारी १.०० वाजता. कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल रो हाऊस, प्लॉट नं-१, ६२६, मारुती अपार्टमेंट पनवेल ४१०२०६ |

**टिप-**

१) लिलावाचे अटी व शर्तीचे वाचन लिलावाच्या वेळी करण्यात येईल
२) मिलावापूर्वी कर्ज खाते बंद झाल्यास लिलाव रद्द केल्या जाईल.
३) येणे रक्कमेचा विचार करून मालमतेची विक्री केली जाईल.
४) कोणतेही कारण न दाखवता लिलाव मंजूर अगर नामंजूर करणे व पुढे ढकलणे याबाबतचे अधिकार खालील सही करणार यांनी राखून ठेवला आहे.
४) अपसेट व्हॅल्यू रु. ३२,९९,८९५/- (अक्षरी बतीस लाख नव्याण्णव हजार आठशे पंच्याण्णव रुपये मात्र) याचे वरती बोली करावी लागेल.

**ठिकाण :- पनवेल**
**दिनांक :- १८/११/२०२५**

**सही/-**
**(सुनिल सदानंद गद्रे)**
**विषेश वसुली व विक्री अधिकारी,**
**वसुली अधिकारी**
**महाराष्ट्र स.स. अधिनियम १९६० चे**
**कलम १५६ चे नियम १०७ अन्वे अधिकार प्राप्त**

# गिल दुसऱ्या कसोटीला मुकणार?

## पंतकडे कर्णधारपदाची धुरा येण्याची शक्यता



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दक्षिण आफ्रिकेविरुद्ध सुरू असलेल्या कसोटी मालिकेतील पहिला कसोटी सामना गमावल्यानंतर आता टीम इंडियाच्या अडचणी आणखी वाढल्या आहेत. भारतीय संघाचा कर्णधार शुबमन गिल दुसऱ्या कसोटीतून बाहेर होण्याची शक्यता आहे.

द. आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या कसोटीत भारतीय कर्णधार शुबमन गिलला दुखापत झाली. मानेच्या दुखापतीमुळे पहिल्या डावात तीन चेंडू खेळून तो रिटायर्ड हर्ट झाला, तर दुसऱ्या डावात फलंदाजी करण्यासाठी मैदानावर उतरला नाही. मालिकेतील दुसरा आणि अत्यंत महत्त्वाचा सामना २२ नोव्हेंबरपासून गुवाहाटी येथे खेळवला जाणार आहे. यासाठी संघ लवकरच गुवाहाटीला पोहचेल, परंतु गिल या सामन्यातून बाहेर राहू शकतो, असे संकेत मिळत आहेत.

बंगाल क्रिकेट असोसिएशनमधील सूत्रांनी पीटीआयला माहिती दिली की, गिल गुवाहाटीला जाणार नाही. डॉक्टरांनी गिलला सध्या विमान प्रवास न करण्याचा सल्ला दिला आहे. त्यांनी गिलला विमानाने जाऊ नये असे सांगितले आहे आणि म्हणूनच तो गुवाहाटीला जाणार नाही. गिलच्या दुखापतीचे दररोज मूल्यांकन केले जात आहे

याबाबत बीसीसीआयने अद्याप अधिकृत घोषणा केलेली नाही, मात्र जर गिल पूर्णपणे तंदुरुस्त नसेल, तर लवकरच याबद्दलची माहिती जाहीर होण्याची शक्यता आहे. चाहत्यांचे लक्ष आता गिलच्या दुखापतीच्या अपडेटकडे लागले आहे. गिल दुसऱ्या कसोटीतून बाहेर पडला, तर संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी कोणावर येणार? या प्रश्नाच्या उत्तराची उत्सुकता सर्वांनाच लागून राहिली आहे.

सध्या द. आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेसाठी ऋषभ पंत हा भारतीय संघाचा उपकर्णधार आहे. अशा परिस्थितीत तोच दुसऱ्या कसोटीत कर्णधारपदाची धुरा सांभाळताना दिसू शकतो. वास्तविक, कर्णधारपदासाठी अनेक पर्याय उपलब्ध असले तरी अशा आणीबाणीच्या परिस्थितीत उपकर्णधारालाच कर्णधार बनवण्याची प्रथा भारतीय क्रिकेटमध्ये आहे.



# ‘सीकेटी’च्या अवधूत नाईकची राज्यस्तरीय स्केटिंग स्पर्धेसाठी निवड

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून शुभेच्छा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक संचालनालय आणि मुंबई उपनगर क्रीडा कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने अमेया क्लासिक क्लब यशवंतनगर विरार येथे झालेल्या मुंबई विभागीय स्केटिंग स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयातील अवधूत सागर नाईक (इ.बारावी) या विद्यार्थ्याने प्रथम क्रमांक प्राप्त केला. त्याची राज्यस्तरीय स्केटिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

अवधूतने केलेल्या चमकदार कामगिरीबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ.एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे व स्वाती पाटील, क्रीडा शिक्षक अरुण पाटील, मनोज पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अवधूतचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## कूच बिहार ट्रॉफी क्रिकेट स्पर्धा

# महाराष्ट्राच्या जक्षन सिंह, सुवाशिक जगताप यांची शतके

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील नागोठणे येथील रिलायन्स स्टेडियमच्या मैदानावर कूच बिहार ट्रॉफी क्रिकेट स्पर्धेतील महाराष्ट्र विरुद्ध ओडिशा हा सामना खेळला जात आहे. महाराष्ट्राने प्रथम फलंदाजी करताना पहिल्या डावात सर्व गडी गमावत १४९.३ षटकांमध्ये ५२८ धावा केल्या. महाराष्ट्राच्या जक्षन सिंह, सुवाशिक जगताप यांनी शतके झळकावली.

सलामीवीर फलंदाज जक्षन सिंह याने सामन्याच्या पहिल्या दिवशी धुवांधार फलंदाजी करत १३ चौकार व एका षटकाराच्या सहाय्याने १०२ धावा ठोकत आपले शतक पूर्ण केले. दुसऱ्या दिवशी महाराष्ट्राचा मधल्या फळीतील अष्टपैलू खेळाडू सुवाशिक जगताप याने मैदानाच्या चौफेर



टोलेबाजी करत ११७ धावा काढल्या. त्यामध्ये १३ चौकार व एका षटकारांचा समावेश होता. महाराष्ट्राने दुसऱ्या दिवशी सर्व गडी गमावत १४९.३ षटकांमध्ये ५२८ धावांचा डोंगर उभा केला.

ओडिशाकडून अर्पित मोहंती याने सर्वाधिक पाच, तर राझ यादव व रूद्र मलिक यांनी प्रत्येकी दोन फलंदाजाना बाद केले. ओडिशा संघाने सावध सुरुवात करत दिवसाअखेर तीन गडी गमावत १३४ धावा केल्या. त्यामध्ये स्वागत मिश्रा ४२ आणि बिश्वजीत प्रधान नाबाद २८ धावांवर खेळत आहे. महाराष्ट्राच्या संघाकडून अर्कम सय्यद आणि अभिनंदन अडक यांनी प्रत्येकी एक फलंदाज बाद केला.

महाराष्ट्राच्या संघाचे मुख्य प्रशिक्षक इंद्रजीत कामतेकर व व्यवस्थापक राहुल अरवाडे यांनी खेळाडूंच्या कामगिरीवर समाधान व्यक्त केले आहे. सामना पाहण्यासाठी महाराष्ट्राच्या संघाचे माजी क्रिकेटपटू व मुख्य सिलेक्टर श्रीकांत काटे व निवड समितीचे सदस्य शिरीष कामथे उपस्थित होते.

# गुरप्रीतला सेंटर फायर पिस्तूलमध्ये ‘रौप्य’

**कैरो : वृत्तसंस्था**

येथे आयोजित ऑलिम्पिक नेमबाजी रेंजमध्ये पुरुषांच्या २५ मीटर सेंटर फायर पिस्तूल स्पर्धेत ऑलिम्पियन गुरप्रीत सिंगला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. गुरप्रीतला युक्रेनच्या पावलो कोरोस्टिलॉव्हकडून पराभव पत्करावा लागला.

विश्वचषक स्पर्धेतील गुरप्रीतचे हे दुसरे वैयक्तिक पदक आहे. यापूर्वी २०१८मध्ये चांगवान येथे गुरप्रीतने २५ मीटर स्टँडर्ड पिस्तूल स्पर्धेत रौप्यपदक जिंकले होते. फ्रान्सच्या यान पिएर लुईस फ्रिड्रीचीने कांस्यपदकावर मोहोर उमटवली.

या स्पर्धेत भारताने एकूण १३ पदकांसह (तीन सुवर्ण, सहा रौप्य आणि चार कांस्य) तिसरा क्रमांक प्राप्त करत मोहिमेची सांगता केली. चीनने १२ सुवर्ण, सात रौप्य आणि दोन कांस्यपदकांसह अव्वल स्थान पटकावले. दक्षिण कोरियाने सात सुवर्ण, तीन रौप्य आणि चार कांस्यपदकांसह एकूण पदकतालिकेत दुसरे स्थान मिळवले.



# खेलो इंडिया ॲथलेटिक्स स्पर्धेत एसएसआरटी स्कूलचे यश

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**


केंद्र शासनाच्या खेलो इंडिया या उपक्रमांतर्गत भारतीय क्रीडा प्राधिकरण व भारतीय ॲथलेटिक्स यांच्या संयुक्तपणे मुलींसाठी अस्मिता लीग ॲथलेटिक स्पर्धेचे आयोजन कळंबोली येथे करण्यात आले होते. यामध्ये रयत शिक्षण संस्थेच्या सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर (एसएसआरटी) स्कूल सीबीएससी, उलवे नोडने यश प्राप्त केले आहे.

स्पर्धेत स्कूलमधील सहा मुलींनी क्रीडा प्रशिक्षक संग्राम फोफेरकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहभाग घेतला होता. यातील मेघना कुडले (इयत्ता पाचवी) हिने द्वितीय, तर तनुश्री ज्ञानेश्वर पाटील (इयत्ता आठवी) हिने तृतीय क्रमांक प्राप्त केला. या विद्यार्थिनींचा प्रमाणपत्र व मेडल देऊन गौरव करण्यात आला. यशस्वी विद्यार्थिनींचे स्कूलच्या मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर यांनी अभिनंदन केले.

# टीम इंडियात गिलच्या जागी अनेक पर्याय उपलब्ध

**गुवाहाटी : वृत्तसंस्था**

भारतीय संघाचा दुखापतग्रस्त कर्णधार शुबमन गिल गुवाहटीच्या मैदानात रंगणाऱ्या दुसऱ्या कसोटी सामन्याला मुकण्याची शक्यता आहे. जर तो उपलब्ध नसेल तर सध्याच्या संघात त्याच्या बदली खेळाडूच्या रूपात दोन पर्याय उपलब्ध आहेत. याशिवाय दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या कसोटी मालिकेसाठी संघात स्थान न मिळालेल्या तीन चेहऱ्यांपैकी एकाला संघात वाइल्ड कार्ड एन्ट्री देण्याचा पर्यायही खुला असेल.



गिल दुसऱ्या कसोटी सामन्यातून बाहेर पडला तर त्याच्या जागी साई सुदर्शनला प्लेइंग इलेव्हनमध्ये संधी मिळू शकते. पहिल्या कसोटी सामन्यात वॉशिंग्टन सुंदरला त्याच्या जागी तिसऱ्या क्रमांकावर पसंती देण्यात आली होती. सुंदरने चांगली कामगिरी केली असली तरी हा प्रयोग फसवा आणि टीम इंडियातील अस्थिरता दाखवणारा होता. कदाचित त्यामुळेच गिल उपलब्ध असला तरी साई सुदर्शन प्लेइंग इलेव्हनमध्ये खेळण्याची शक्यता अधिक आहे.

देवदत्त पडिक्कलही दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या कसोटी संघाचा भाग आहे. इंग्लंडविरुद्ध पदार्पणानंतर त्याला संघाकडून सातत्यपूर्ण संधी मिळालेली नाही, पण देशांतर्गत क्रिकेटमध्ये त्याने कमालीची कामगिरी केली आहे. त्याच्या रूपात एक पर्याय टीम इंडियाकडे उपलब्ध आहे.

सुदर्शन आणि पडिक्कल दोघेही डावखुरे फलंदाज आहेत. जर गिलच्या जागी बदली खेळाडूच्या रूपात उजव्या हाताच्या फलंदाजाला खेळवण्याचा विचार संघ व्यवस्थापनाने केला, तर संघाबाहेर असलेल्या तीन चेहऱ्यांचा विचार केला जाऊ शकतो. यात सरफराज खानचाही समावेश आहे. सरफराजचा देशांतर्गत क्रिकेटमधील रेकॉर्ड कमालीचा आहे. तो सध्या फॉर्ममध्येही आहे. त्यामुळे तो गिलच्या जागी सर्वोत्तम पर्याय ठरू शकतो.

देशांतर्गत क्रिकेटमधील सातत्यपूर्ण कामगिरीनंतर करूण नायरला इंग्लंड दौऱ्यावरील पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत संधी मिळाली, पण परदेशी मैदानात तो आपल्या फलंदाजीतील धमक दाखवण्यात कमी पडला. हा दौरा होताच त्याला संघाबाहेरचा रस्ता दाखवण्यात आला. रणजी सामन्यात कर्नाटकविरुद्धच्या सामन्यात नायरने पहिल्या डावात ९५ धावांची लक्षवेधी खेळी केल्याचे पहायला मिळाले. मोक्याच्या क्षणी भारतीय संघ त्याच्या अनुभवाचा वापर करण्याला पसंती देणार का? ते पाहण्याजोगे असेल.

ऋतुराज गायकवाड हा वनडे आणि टी-२०मध्ये सलामीच्या बॅटरच्या रूपात खेळतो, पण रेड बॉल क्रिकेटमध्ये तो चौथ्या क्रमांकावर खेळताना पहायला मिळतो. ऋतुराज हादेखील सध्या चांगल्या फॉर्ममध्ये असून तांत्रिकदृष्ट्या सक्षम असलेल्या या गड्याचाही पर्याय टीम इंडियाकडे असेल. ऋतुराज आतापर्यंत एकही कसोटी सामना खेळलेला नाही.






# पोर्तुगालचे फिफा वर्ल्डकप तिकीट निश्चित

## रोनाल्डोला स्वप्नपूर्तीची संधी

**पोर्टो : वृत्तसंस्था**

ख्रिस्तियानो रोनाल्डोच्या गैरहजेरीतही पोर्तुगालने अर्मेनियाचा ९-१ असा दणदणीत पराभव करत २०२६ फिफा फुटबॉल विश्वचषक स्पर्धेत आपले स्थान निश्चित केले आहे. या विजयामुळे रोनाल्डोला विक्रमी सहाव्या विश्वचषक स्पर्धेत खेळण्याची संधी मिळणार आहे. यापूर्वी मागील लढतीत आर्यलंडविरुद्ध रेड कार्ड मिळाले असल्याने रोनाल्डोला अर्मेनियाविरुद्ध खेळता आले नव्हते.



येत्या जूनमध्ये अमेरिका, कॅनडा व मेक्सिको येथे आगामी फिफा वर्ल्डकप खेळवला जाईल, त्यावेळी रोनाल्डो ४१ वर्षांचा असणार आहे. आतापर्यंतच्या प्रदीर्घ कारकिर्दीत रोनाल्डोला केवळ फिफा वर्ल्डकपच जिंकता आलेला नाही. त्यामुळे आता या शेवटच्या प्रयत्नात त्याची कसर भरून काढण्याची त्याची महत्त्वाकांक्षा असेल.

आर्यलंडविरुद्ध बाहेर पाठवल्यामुळे या पोर्तुगीज खेळाडूला आणखी दोन सामन्यांचे निलंबन भोगावे लागू शकते, मात्र तो तंदुरूस्त राहिल्यास रॉबर्टो मार्टिनेझच्या संघात आपले स्थान कायम राखेल अशी अपेक्षा आहे. आर्यलंडकडून अनपेक्षित पराभव पत्करल्यानंतर पोर्तुगालसाठी हा विजय अत्यंत महत्त्वाचा होता. एफ गटात अव्वल स्थान मिळवण्यासाठी त्यांना आर्मेनियाला हरवणे अनिवार्य होते. हंगेरीला गटात पोर्तुगालला मागे टाकून आघाडी घेण्याची संधी होती, पण बुडापेस्टमध्ये आर्यलंडकडून त्यांना ३-२ असा नाट्यमय पराभव पत्करावा लागला. आर्यलंडच्या ट्रॉय पॅरॉटने अविश्वसनीय हॅट्ट्रिकसह दुसरे स्थान आणि प्लेऑफमधील जागा निश्चित केली. त्याने ८०व्या मिनिटाला बरोबरी साधणारा गोल आणि अतिरिक्त वेळेच्या सहाव्या मिनिटाला निर्णायक विजय गोल केला.

अन्य एका सामन्यात एर्लिंग हालंडने ७९व्या मिनिटाला केलेल्या महत्त्वपूर्ण गोलमुळे नॉर्वेने इटलीविरुद्ध ४-१ असा विजय मिळवला आणि वर्ल्डकपमधील आपले स्थान निश्चित केले. नॉर्वेने वर्ल्डकपसाठी पात्रता मिळवण्याची ही १९९८नंतरची पहिलीच वेळ ठरली. अल्बेनियावर विजय मिळवून इंग्लंडनेही आपले स्थान निश्चित केले.

# डब्ल्यूपीएलचा मेगा लिलाव २७ नोव्हेंबरला दिल्लीत

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

डब्ल्यूपीएल २०२६ मेगा लिलावाचा मुहूर्त पक्का झाला आहे. डब्ल्यूपीएलच्या चौथ्या हंगामाच्या आधी मेगा लिलाव प्रक्रिया २७ नोव्हेंबर रोजी नवी दिल्ली येथे पार पडणार आहे. स्पर्धेत सहभागी पाच संघ रिटेन रिलीजच्या खेळानंतर मेगा लिलावात मजबूत संघ बांधणी करण्यासाठी उतरतील.

डब्ल्यूपील मेगा लिलाव हा एक दिवसाचा अत्यंत हाय-एनर्जी इव्हेंट असेल. पाचही फ्रँचायझी आपापला संघ अधिक मजबूत करण्यासाठी मोठी बोलू लावून मजबूत संघ बांधणी करताना दिसतील. नियमानुसार प्रत्येक फ्रँचायझीला १८ महिला खेळाडूंसह संघ बांधणी करायची आहे. मेगा लिलावासाठी एकूण ७३ स्लॉट उपलब्ध असून त्यापैकी २३ स्लॉट परदेशी खेळाडूंकरिता राखीव आहेत.

या मेगा लिलावासाठी यूपी वॉरियर्स फ्रँचायझी संघाकडे सर्वाधिक १४.५ कोटी इतकी रक्कम शिल्लक आहे. त्यापाठोपाठ गुजरात जाएंट्स नऊ कोटी, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू ६.१५ कोटी, मुंबई इंडियन्स फ्रँचायझी ५.७५ कोटी, तर दिल्ली कॅपिटल्स संघ ५.७ कोटींच्या पर्ससह मेगा लिलावात उतरेल.

क्रिकेट चाहते जियो हॉटस्टारवर लिलावाचे लाईव्ह स्ट्रीमिंग पाहू शकतात. याशिवाय स्टार स्पोर्ट्स नेटवर्कवरदेखील याचे थेट प्रेक्षपण करण्यात येईल.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com